माणूस शनिवार । २० जानेवारी १९७३ । पन्नास पैसे



मराठी
वृत्तपत्रसृष्टीचे
जनक

# डॉ. परुळेकर

'सकाळ' हा मराठी वृत्तपत्रसृष्टीचा खरा आरंभ होता. तत्पूर्वी पत्रकर्ते होते पण वृत्तपत्रे नव्हती. टिळक-आगरकर-परांजपे युग, किंवा त्यानंतरचा खाडिलकर-केळकरांचा काळ हा विचारपत्रांचा काळ होता. समाजाला काही विचार, काही प्रेरणा देण्याची या व्यक्तींना तळमळ होती. बातम्यांना, ताज्या घडामोडींना येथे फारसा वाव नव्हता. त्यावरील भाष्ये महत्वाची होती. केसरी-काळ, संदेश-नवाकाळ ही मुख्यत: मतपत्रे होती. संपादक आपापले विचार, मते आग्रहाने प्रतिपादन करीत असत, त्यासाठी वेळ पडल्यास तुरुंगवास, दंड इत्यादी शिक्षाही भोगण्याची त्यांची तयारी असे. थोडक्यात राजकीय-सामाजिक उद्दिष्टांना महत्व होते, ही सर्व मतपत्रे होती. लोकांची गरज, आवड याकडे लक्ष पुरवायला या पत्रांना फारसा वेळ नव्हता, तशी अवश्यकतासुद्धा त्यांना भासत नव्हती.

सकाळने हे चित्र बदलले. भाष्यं आणि अग्रलेख याऐवजी बातम्यांना केंद्रस्थान देण्याची परंपरा मराठीत सकाळने सुरू केली. याअर्थाने सकाळकार नानासाहेब परुळेकर हे मराठी वृत्तपत्रसृष्टीचे नेमक्या अर्थाने 'जनक' ठरतात. सकाळ हे आधुनिक अर्थाने मराठीतील पहिले वृत्तपत्र ठरते.

विचारपत्र नसूनही सकाळचे अग्रलेख मोठ्या प्रमाणावर वाचले जात. याचे कारण ते विक्षिप्त आणि काही वेळा विकृत असले तरी सकाळकारांचे स्वतंत्र विचार त्यात मांडलेले असत. राज्यकर्त्यांचे किंवा एखाद्या पक्षाचे ते अनुवाद नव्हते. सकाळ बहुजन समाजात लोकप्रिय होता. पण राज्यकर्त्यांच्या किंवा बहुजन-समाजाच्या आहारी सकाळ केव्हाही गेला नाही. या आपल्या स्वतंत्र वृत्तीसाठी सकाळला सरकारचा व बहुजनांचा अनेकदा रोष व अप्रियता सहन करावी लागली. पण सकाळ नमला नाही. वाहत्या गंगेशी टक्कर देण्याचे सकाळकारांचे हे धैर्य असामान्य होते. यामुळेच सकाळला एक व्यक्तिमत्त्व प्राप्त झाले — जे आज मोठमोठ्या वृत्तपत्रांनाही लाभलेले नाही. प्रचंड खप असूनही ही वृत्तपत्रे निस्तेज व ठिसूळ वाटतात. एका बाजूने राज्यकर्त्यांना, जाहिरातदारांना शरण गेलेली. दुसरीकडून गुळगुळीत कागदावर बुळबुळीत मजकूर छापून वाचकांचा अनुनय करणारी. सकाळ या शरणयात्रेत शेवटपर्यंत सामील झाला नाही. सकाळची मान नेहमी ताठच राहिली.

या ताठ मानेला 'माणूस'चे अभिवादन.

—संपादक

२० जानेवारी १९७३

संपादक
श्री. ग. माजगावकर

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा  अंक : तेहतीस

## सप्रेम नमस्कार...

□ आपल्या माणूस साप्ताहिकाचा मी कित्येक वर्षांपासून वाचक आहे. आपल्या ध्येयवादी साप्ताहिकाने तरुण मनाला अक्षरशः झपाटले आहे त्यांत मी एक आहे उर्मी उसळून येते पण जागचे जागी जिरते. हातून काही होऊ शकत नाही. दुष्काळी जनतेला सरकारी घोषणाबाजीने नुसतं झुलवत ठेवले आहे. प्रत्यक्षात नोकरशाही (अधिकारी वर्ग) आणि सत्ताधारी (पुढारी) यांची ' चंगळ ' आहे. दुष्काळ सामान्य जनतेलाच आहे. यासाठी आमच्या येथील कर्म कहाणी ऐकवितो.

लासलगाव ही कांद्याची मोठी बाजारपेठ. येथे एक आर्टस् आणि कॉमर्स कॉलेज आहे. कॉलेजची भव्य व टोलेजंग इमारत आहे. पण हिचा सर्व कारभार शेठजी मंडळींच्या ताब्यात आहे. शेठजी मंडळींनी कॉलेजसाठी किती पैसे दिले असतील, आपणास वाटते ? शून्य पैसे ! ! !

मग शेठजी मंडळीच्या ताब्यात कॉलेजचा कारभार गेला कसा ?

तर कृषी उत्पन्न बाजार समितीने असा ठराव केला की शेतकऱ्यांच्या मालाच्या विक्रीतून शेकडा २० पैसे कॉलेज फंड कापून घ्यावा. आणि त्यानुसार ३ वर्षात ७ लाख रुपये जमले. हो महाराज ! सातलाख वर ६० हजार रुपये. पण ६० हजार रुपये शेठजी मंडळींनी अजून कॉलेजला दिलेच नाही. फंड मात्र कापता आहेत बेटे !

हा फंड आडत दुकानात कापला गेला व शेठजी मंडळींकडे जमा झाला. तो कुणाच्या नावाने कॉलेजमध्ये जमा करायचा ? हा प्रश्न पडल्यावर ज्या

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

आडत दुकानात ह्या फंड जमा केला त्याच शेठजींच्या नावाने फंड जमा करावा हे सर्वानुमते ठरले. शेठजीने स्वत:चा नवा पैसा न देता हजारो रुपये देणगी त्यांचे नावाने जमा झाली व ते संस्थेचे कायमचे सभासद झाले.

जेव्हा ग्रामपंचायत निवडणुकीने शेठजी व इतर ही तटबंदी निर्माण झाली त्याचवेळी कॉलेजच्या कार्यकारीणीची निवड झाली व त्यांत सर्व फुकटे शेठजी खुर्चीवर स्थानपन्न झाले. ज्यांचे पैसे होते त्या शेतकऱ्याला मतदानाचाही अधिकार नाही. त्यामुळे पाटील गडगडले आणि शेठजी आले. अंधळं दळतं आणि कुत्र पिठ खातं ! आहे की नाही गंमत !

ए. बी. उगले, लासलगाव

[ह्याच माहितीबरोबर धडक योजनेचा अधिकारी कसा फायदा करून घेत आहेत याचे टाईप केलेले निवेदन आपल्याकडे पाठवित आहे. संबंधीतांकडे ५० ते ६० सह्यानिशी ते पाठविले आहे. निवेदन येणे प्रमाणे--

हेतूने ज्या शेतकऱ्यांना शक्य आहे त्यांना इलेक्ट्रिक मोटार्स कर्जाऊ देण्याचे जाहीर केले.

निफाड तालुक्यात १२१ गावे आहेत. प्रत्येक गावातून सरासरी ५०-७५ अर्ज आलेले आहेत. ह्या कामी प्रत्येक खेड्यापाड्यातून तलाठी तळ देऊन बसले होते. ७-१२ उतारा, खाते उतारा यासाठी प्रत्येकाकडून २ ते ५ रु घेतले गेले. काही ठिकाणी उदा. निमगाव वाकडा, ता. निफाड, जि. नासिक येथील तलाठी कार्यालयात प्रत्येक प्रकरणामागे १५ रु. घेतले गेले आहेत, असे समजते. म्हणजे तालुक्यातून एकूण ९ ते १० हजार अर्ज आले असावेत. त्यापैकी फक्त ५० इले. मोटार्स संपूर्ण तालुक्यात वाटल्या गेल्या आहेत.

त्यातही जे लोक फक्त ओरियंट मोटार्स घेतील त्यांचीच प्रकरणे पास करण्यात आली. एका पिंपळगाव बसवंत विक्रेत्याकडून ३०, लासलगावी विक्रेत्याकडून ११ मोटार्स उचलण्यात आल्या

# धडक योजना : जिल्हा नासिक, ठाणे

ना. मुख्यमंत्रीसाहेब,
महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे सेवेत.

विषय : **धडक योजनेच्या नावाखाली सुरू झालेल्या जनतेच्या लुबाडणुकीबाबत...**

महाशय,

महाराष्ट्र सरकारने दुष्काळात जनतेला साह्य करणेसाठी व दुष्काळात अधिक धान्य उत्पादन व्हावे या उदात्त व इतर दुकानांतून मोटारी घेणाऱ्यांचे पेमेंट देण्यात आलेले नाही. याचा अर्थ निघतो की, मोटार्स विक्रेता, तलाठी व पास करणारे तहसिलदार यांचे संगनमतानेच ठराविक शेतकऱ्यांनाच मोटार्स देण्यात आल्या आहेत.

ह्यापेक्षा वाईट याचे वाटते की, तलाठ्याने प्रत्येक गावातून ५०-७५ प्रकरणे तयार केली. एका तलाठ्याच्या ताब्यात ५ शे गावे आहेत. म्हणजेच उताऱ्याच्या फीचाच ५०० रु. लाभ

प्रत्येक तलाठ्याला झाला. ह्याशिवाय विक्रेत्याकडून हात ओला झाला. काही शेतकऱ्यांकडून अधिक पैसे घेतले ते वेगळे. हा धडक योजनेचा दुष्काळी परिस्थितीतील नवीनच प्रकार जनतेला शासनाने पुरविला आहे काय? ह्या प्रकरणात तलाठी व तहसिलदार ह्यांनी गरीब शेतकऱ्याला अक्षरश: लुटून हजारो रुपयांचा फायदा करून घेतला आहे. जर शासनाला थोड्याच मोटारी वाटावयाच्या होत्या तर प्रत्येक गावातून गरिबातील गरीब १-२ शेतकऱ्यांकडून अर्ज मागवायचे होते व त्यातूनच प्रकरण मंजूर करावयाचे होते. तालुक्यातून ९ ते १० हजार लोकांची फसवणूक व लुबाडणूक झाली नसती. ह्या धडक योजनेत ९९ टक्के श्रीमंत लोकांचीच प्रकरणे मजूर झाली आहेत. धडक योजना फक्त श्रीमंतासाठीच होती काय? याबाबत विचार होऊन योग्य ती चौकशी व्हावी. —आपले नम्र, शेतकऱ्यांच्या सह्या

## जिल्हा ठाणे

□ चालू वर्षी संबंध महाराष्ट्राप्रमाणे ठाणे जिल्ह्यालाही पावसाने बनविले. त्यामुळे बहुतेक सर्व भातपिके करपून गेली. म्हणून ठाणे जिल्हा परिषदेने रब्बीची धडक योजना राबविण्याचा संकल्प केला. जे शेतकरी दर वर्षी भात लावीत त्यांना मनाई करण्यात येऊन गहू किंवा हायब्रीड ज्वारी पेरण्यास सांगण्यात आले. शेतीच्या जमिनीत या धडक योजना काळात भाजीपाला लावण्यास मनाई करण्यात आली. शेतकी यंत्रणा खेड्यातील शेताशेतांत फिरून गव्हाची पेरणी करण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त करीत सुटली. रब्बी धडक योजनेचा मुहूर्त १॥ महिन्यापूर्वी ना. हरिभाऊ वर्तकांच्या हस्ते त्यांच्याच तालुक्यात भिनार या गावानजिक गव्हाच्या पेरणीने करण्यात आला. मंत्र्याचे फोटो वृत्तपत्रातून झळकलेही. मग साऱ्या जिल्ह्यात शेतकऱ्यांनी भराभर गव्हाच्या पेरण्या केल्या. काही ठिकाणी हायब्रीड ज्वारीही पेरली. शेतकीतज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार खतेही भरपूर वापरली. साधारणत: एकरी २५० रुपये शेतकऱ्यांनी खर्चिले आणि गव्हाचे रोपटे जन्माबरोबरच कणीस घेऊन येऊ लागले. पण अपुऱ्या दिवसांचे पोर मरून जाते तसे कणीस वाळून जाऊ लागले आणि रोपटेही मरू लागले. आता शेतकऱ्यात कमालीचा हाहा:कार उडाला आहे. ज्यांनी भात लावले असते, भाजीपाला लावला असता तोही नाही आणि धडक योजनेच्या धडकीने रिकाम्या पोटी नसत्या कर्जाचा डोंगर मात्र शिरावर बसला आहे.

वसई तालुका पंचायत सदस्य श्री. शांताराम जाधव यांनी या बोगस योजनेवर तालुका पंचायत सभेत अक्षरश: आग ओकली. आधीच उपाशी असलेल्या शेतकऱ्यांना जिल्हा परिषदेने फसविले शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्या, असा त्यांनी धोशा लावला.

गव्हाचे बियाणे सरकारच्या शेतकी फार्मकडून न घेता ते बोरीवलीच्या एका व्यापारी गोडाऊनमधून जुना गहू घेण्यात येऊन तो बियाणे म्हणून शेतकऱ्यांना देण्यात आला, असा त्यांचा सरळ आरोप होता. पालघर, डहाणू, वाडा, भिवंडी, मुरबाड—सर्वत्र जिल्ह्यात धडक योजनेचा बोजवारा उडाला. शेतकरी नव्याने कर्जबाजारी झाला आहे.

प्रभाकर म्हात्रे, गोरेगाव

# शाई सुकून गेली

किरण ठाकूर

पुण्याच्या सर परशुरामभाऊ कॉलेजात असताना आम्ही 'सकाळ' चाळत असू मॅटिनी सिनेमा पहाण्यासाठी. हॉस्टेलच्या मेसमधून बडीशेप चघळत कॉमनरूममध्ये जायचे, सकाळचे शेवटचे पान पाहून कॉलेजच्या लेक्चर्सऐवजी कोणता 'पिक्चर अटेंड' करायचा याचा निर्णय आम्ही घेत असू. पुण्याबाहेरून आलेल्या माझ्यासारख्या अनेकांना अग्रलेखाच्या वर छापलेल्या डॉ. ना. भि. परुळेकर एम. ए. पी. एच. डी. (कोलंबिया) या प्रकरणाशी काही घेणे नव्हते. बातम्या किंवा लेख वाचायचे असले तर इतर वर्तमानपत्रांकडे मोर्चा वळायचा.

पत्रकार व्हायचे वेड डोक्यात भिरभिरून १९६९ मध्ये विद्यापीठाच्या वृत्तपत्रविभागात नाव दाखल केले तेव्हा प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि त्याहीपेक्षा खर्च भागविण्याची सोय करणे आवश्यक होते. डिपार्टमेंटचे डायरेक्टर ल. ना. गोखले यांना पैशाची अडचण सांगितली तेव्हा त्यांनी पटकन नाव सुचविले ते ना. भि. परुळेकरांचे.

तोपर्यंत आणि त्यानंतरही अनेक महिने या पत्रमहर्षीला पाहिले नव्हते. गोखलेसर म्हणाले, नानासाहेबांच्या नावावर 'वैयक्तिक' पत्र लिहून विनंती कर. काम नक्की होईल. पुण्यातील अनेक गरजू विद्यार्थ्यांना त्यांनी सक्रीय मदत केली आहे. तुझं नशीब जोरावर असलं तर तुझा कोर्सही पुरा होईल आणि पुढेही तिथेच नोकरी करू शकशील.

कॉलेज विद्यार्थ्यांना अर्धवेळ बातमीदारी देऊन त्यांच्याकडून नानासाहेब काम करून घेत. पैसे तसे थोडे असत पण महिनाखर्च भागे. शिवाय थ्रिल असे, मित्रमैत्रिणींवर इंम्प्रेशन मारता येई.

माझे पत्र गेले तेव्हा नानासाहेब आग्नेय आशियाच्या दौऱ्यावर निघाले

होते. पण माझे काम झाले होते. अर्धवेळ उपसंपादक म्हणून चार तास काम करू लागलो होतो. नानासाहेबांची भेट झाली नव्हती. नंतर ते परत आले तेव्हासुद्धा खूप दिवस योगच आला नाही. माझी वेळ संध्याकाळची होती, तेव्हा ते सहसा येत नसत. आलेच तर सावकाश, अलगद पावलं टाकीत येत. काम आटोपले की निघून जात. आपल्या संपादक विभागात कुणी नवीन पोरगा काम करतो आहे याची त्यांना जाणीवही नसायची.

पण ही गोष्ट अपवादात्मक नसावी. जेष्ठ सहकारी एक किस्सा नेहमी सांगत. असाच एक कॉलेज रिपोर्टर कुठल्याशा समारंभाला गेला होता. सभास्थानी असलेल्या इतरांची नावे त्याला परिचित होती. सूट परिधान केलेली ही कृश वयोवृद्ध मूर्ती मात्र त्याला माहीत नव्हती. त्याने शेजारी बसलेल्या दुसऱ्या पत्रकाराला विचारलं, 'हा म्हातारा कोण हो?' त्याने आश्चर्ययुक्त प्रश्नार्थक चेहरा केला आणि उपरोधाने म्हणाला, 'तुझा बाप!' ज्यांच्याकडचा पगार आपण मिळवितो, ते परुळेकर आपल्याला माहीत नव्हते याची त्याला नव्याने जाणीव झाली असावी.

माझ्या दोन वर्षांच्या वास्तव्यात नानासाहेब सकाळ कचेरीत फारसे नसायचे. म्हणजे शरीराने. त्यांची छाया मात्र छपाईखात्यापासून संपादक खात्यापर्यंत सतत पडलेली असायची. सगळी कामं सुरळीत, शिस्तबद्ध आणि वेळच्या वेळी व्हायची. 'नानासाहेबांना अमुक आवडायचं नाही', 'ते रागावतील' किंवा 'हे सकाळच्या धोरणाविरुद्ध आहे' असा अदृश्य वचक असायचा. नानासाहेब बाहेर गावी आहेत म्हणून बातम्या चुकायच्या नाहीत, त्यांची मांडणी किंवा मथळे चुकायचे नाहीत, मशीन वेळेवर चालू होऊन अंक गाड्यांच्या वेळेवर हजर होणे टळले नाही. या इवल्याशा मूर्तीचे आकर्षण, तिच्याविषयीची श्रद्धा, आदर, काहीशी भीती अशी सतत वाढत रहायची. त्यांच्या ऐसपैस केबिनमधली प्रशस्त खुर्ची म्हणजे मोठे कुतुहल वाटायचे.

जरनॅलिझमचा कोर्स पुरा करून त्यात विशेष प्राविण्य वगैरे मिळविले ते दिमाखाने नानासाहेबांना दाखवून पूर्ण वेळ कायम नोकरी मिळवायचे ठरविले. प्रत्यक्षात मुलाखतीला बोलाविले तेव्हा सूक्ष्म कंप सुटला होता. मी आधीपासून काम करतो आहे, अशी आठवण करून दिली तेव्हा 'आज काय काम केलं आणा वरं जरा' म्हणून त्यांनी सावकाश पण वजनदार आवाजात सांगितलं. चटकन उठून मी कॉप्या आणून दाखवल्या. प्रत्येक शब्द काळजीपूर्वक वाचून त्यांनी चाचणी घेतली. मग पुन्हा माझ्या अर्जात डोकावून म्हणाले, 'हे पहा, पत्रकारी म्हणजे सोपी गोष्ट नाही. कष्ट उपसावे लागतात. वेळ अवेळ पहाता येत नाही. रोज नवीन शिकावं लागतं. तुम्हा पोरांना आधी खूप हौस असते. मग भ्रमनिरास होतो. तुम्ही सायन्स ग्रॅज्युएट आहात. अजूनही विचार करा. दुसरीकडे जास्त पगाराची नोकरी सहज मिळेल.'

मनात म्हटलं 'गुरुदेव तुम्ही ग्रेटच आहात. पत्रकार होण्याची नशा चढली आहे. तुमच्याकडे आलो ते हे ऐकायला नाही. कष्टाचं काय घेऊन बसलात? कोल्हापूर जिल्ह्यातील गोडची गावाहून पुण्यापर्यंत चालत येण्याचा पराक्रम केल्याचे मी ऐकले आहे. कष्ट करून 'सकाळ'ची उभारणी कशी केली हे मला पाठ झाले आहे. कष्टाची भीती कशाला दाखविता?'

प्रत्यक्षात काही बोललो नाही. कामाला लागलो. दोन वर्षात शिकलो ते कष्ट करणे. यातसुद्धा मी एकटा म्हणून नव्हतो. सकाळमध्ये सर्वांना कष्टाची सवय आहे—सर्व विभागात लोक कर्मीच असतात. संपादक विभागात वृत्तसंपादक श्री. ग. मुणगेकर सोडून आम्ही फक्त पाचजण होतो. डाक एडिशन पुरी करता करता नाके नऊ यायचे. मशिन वेळेवर सुरू व्हायला पाहिजे म्हणून मान खाली घालून टेलिप्रिंटरवरच्या तारांची भाषांतर करून कॉलमच्या कॉलम मजकूर भरून काढावा लागे. त्यात पुन: महत्त्वाच्या बातम्या आल्याच पाहिजेत, नाहीतर दुसऱ्या दिवशी बोटभर चिठ्ठीवर निरोप यायचा. 'ही बातमी का वापरली नाही? संपादक विभागासाठी एक आणि नानासाहेबांसाठी खास वेगळा असे प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाचेही दोन टेलिप्रिंटर असायचे. रात्री उशीरापर्यंतच्या तारांचे भेंडोळे घेऊन गडी नानासाहेबांच्या घरी जात असे. त्यात महत्त्वाच्या तारांवर खुणा करून दुसऱ्या दिवशी त्या 'सकाळ'मध्ये आल्या की नाही ते पहात.

'मला भेटावे ना. भि. प.' असे मजकूर असलेले छोटे आयताकृती चिटोरे आले की तो गृहस्थ चरकायचाच. आकृतीने किरकोळ असलेल्या या म्हाताऱ्या देहात काय ताकत होती कुणास ठाऊक पण भले भले मान खाली घालून बोलायचे. चष्म्याच्या आतून रोखून बघणारे डोळे टाळून 'हो' नाही सारख्या संदिग्ध भाषेत उत्तर द्यायचे.

या दराऱ्यामुळे ते आणि त्यांचे सहकारी यांच्यांत एक चमत्कारिक दरी निर्माण झाली होती. त्यांच्या पोटात असह्य कळा येतात, आतडी ओरबाडून फेकून द्यावीत असे वाटण्याइतपत वेदना असतात याची कल्पना ते अगदी जवळच्या मंडळींना सांगत नसत. त्यामुळे त्यांचे कौटुंबिक जीवन कसे होते याची कल्पना दोन वर्ष दैनिकाच्या परिवारात राहूनही आली नाही. १९६५–६६ मध्ये मराठाकार अत्र्यांनी आपल्या शिवराळ भाषेत नानासाहेब आणि मादाम शांताबाई यांच्याविषयी अग्रलेख लिहिल्याचे आठवत होते. पण त्याविषयी उल्लेख करूनही जेष्ठ सहकारी काही सांगत नसत. कन्या लीलाताईंचे आणि नानासाहेबांचे पटत नाही. तिचे वागणे नानासाहेबांना आवडत नाही, वगैरे 'सकाळ' बाहेर कुणी सांगत पण खात्रीलायक असे काही नसायचे. आयुष्यात सर्व काही मिळवून बसलेला हा महर्षि स्वत:ला असे कोंडून का घेत असे हे आणखी एक गूढ. मी त्याच्यापुढे कुणीच

नव्हतो, पण इतर वरिष्ठ मंडळींना? सकाळवर आणि नानासाहेबांवर मनापासून प्रेम आणि भक्ती करणारे अनेक लोक दैनिकाच्या प्रारंभापासून त्यांच्यासोबतच होते. तरीही त्यांच्यात मैत्रीची बरोबरीची भावना येऊ शकली नाही. अंतर नेहमी कायम असायचे.

हाताखालच्या लोकांचे चांगले गुण लक्षात आले की तसं ते सांगत. पत्र लिहित. असे प्रसंग क्वचित असतील, म्हणूनच त्या कौतुकाचे मोल जास्त असे. कोल्हापूरचे त्यावेळचे बातमीदार बाळासाहेब पाटील यांनी हत्ती पिसाळल्याची आणि नंतर त्याला ठार करण्यात आल्याची बातमी मोठ्या नाट्यमय भाषेत तपशीलासह दिली तेव्हा त्यांचे नानासाहेबांनी खूप कौतुक केले होते. पाटील पुण्यात भेटायला आले तेव्हा उत्साहाने त्यांच्याशी गप्पा मारल्या होत्या. त्यांचा इतका हेवा वाटला!

पण याउलट चूक झाली की कोणत्या शब्दात खरडपट्टी काढतील याचा मात्र नेम नसे. 'मूर्ख आहात,' 'गाढव आहात' वगैरे नेहमीचे पण विशेष प्रसंगी यापेक्षाही उग्ररूप धारण व्हायचे. आमच्या एका जाणत्या बातमीदाराने एकदा मोठी गफलत केली होती. एका कॉर्पोरेटरचे एका समाजसेविकेशी बरेच 'सख्य' असल्याची चर्चा त्यावेळी खाजगीतून व्हायची. उघड अर्थातच कोणी बोलत नसे. ते दोघे हजर असलेल्या बैठकीची बातमी लिहिताना या बातमीदाराने कार्पोरेटरचे आडनाव या समाजसेविकेला लावले. ही गफलत नकळत झाली होती, यात मला तरी संशय वाटत नाही. कदाचित त्या दोघांच्या प्रकरणाची चर्चा ऐकून ती डोक्यात असताना बातमी लिहिली म्हणून तसे झाले असावे. संपादकाच्या लक्षात आले नाही आणि सकाळी ती बातमी तशीच प्रसिद्ध झाली. साधारण अकरा वाजता ही समाजसेविका तणतणत प्रवेश करताना दिसली आणि या बातमीदाराचे धाबे दणाणले. समजूत घालण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ. नानासाहेबांनी या बाईचे म्हणणे ऐकून घेतले. बातमीदाराला केबिनमध्ये बोलावून घेतले आणि बाहेर संपूर्ण हॉलभर शांतता पसरली. 'लाज वाटत नाही तुम्हाला? या बाईच्या जागी मी असतो तर तुमच्या थोबाडीत पायातली वहाण हाणली असती' अशा आशयाचा संताप बाहेर पडत होता. हा बातमीदार सकाळमधल्या वरिष्ठांपैकी होता. वयाने आणि अनुभवाने.

उपसंपादकांविषयी काही वेगळी तऱ्हा नव्हती. 'बुधवार पेठेतील गड्यांसारखे आहात' अशी वागणूक या सुशिक्षित संपादकांना मिळायची म्हणे. प्राईस पेज शेड्यूलसाठी सुप्रीम कोर्टात त्यांनी केस लढविली तेव्हा आणि इतरही अनेक ठिकाणी 'माझ्याकडे सब एडिटर्स नाहीत, ट्रान्सलेटर्स आहेत' असे सांगत.

लंडन टाईम्समध्ये आलेल्या एका लेखाचे भाषांतर थोडक्यात करून द्या म्हणून मला सांगितले होते. त्याप्रमाणे ते पाठविले—त्यात काहीतरी चूक झाली.

मी गोंधळून टाईम्समधला मजकूर पुन्हा वाचला. मुळातील इंग्रजीचे भाषांतर बरोबर होते. तसे त्यांना सांगितले तेव्हा ते म्हणाले, 'यातील तपशील बरोबर आहे याची खात्री केली का संदर्भ ग्रंथातून ?'

'नाही.'

'मग नुसते भाषांतर बरोबर असल्याचे काय सांगता ? उपसंपादक सर्व ठिकाणी सारखेच गाढव असतात. सकाळ असो, टाईम्स ऑफ इंडिया असो किंवा लंडन टाईम्स असो–जा आता.'

काय बोलणार ?

आपले दैनिक टांगेवाल्याचे असावे या नानासाहेबांच्या अट्टाहासापायी अनेक वेळा माझ्यासारख्या नव्या उपसंपादकाची तारांबळ उडे. कथा, कादंबऱ्यांतून किंवा इतर दैनिकांतून आत्मसात केलेले मराठी इथे उपयोगाचे नव्हते. इथे हवे सर्वसामान्यांना चटकन समजणारे मराठी. 'लष्करास पाचारण केले' असा आठ कॉलमी मथळा वाचून त्यांनी रात्रपाळीच्या संपादकाला त्याचा अर्थ विचारला. बिचारा गोंधळला. याचा अर्थ आणखी काय असणार ?

'म्हणजे, लष्कर बोलावले.'

'मग तसं का नाही म्हणालात ? माझ्या टांगेवाल्यांना हे समजत नाही बाबांनो. शिवाय एक शब्द नाही का वाचला ?' ध्वजारोहणऐवजी झेंडा फडकविला हवे असायचे. पण अखिल भारतीय काँग्रेसऐवजी ऑल इंडिया काँग्रेस किंवा भारतऐवजी हिंद हवे !

या जागा वाचविण्याच्या सोसापायी 'सकाळ' म्हणजे टवाळीचा विषय बनला खरा. हेडिंगमध्ये सर्व काही आले पाहिजे, पांढरी जागा वाया घालवायची नाही असा आग्रह असायचा. म्हणून 'पाक-चीन मदत करार शक्य । अमेरिकन लष्करगोट अंदाज' असे शब्द एकमेकात मिसळलेले मथळे सर्रास दिसायचे. पूर्वी सकाळमध्ये असलेले सुधाकर अनवलीकर संपूर्ण रामायण सकाळ स्टाईलच्या हेडिंगमध्ये बसवून दाखवायचे !

पण असे असले तरी वृत्तपत्रनीतीच्या मूलभूत तत्त्वांची जपणूक मात्र नानासाहेब जागरुकतेने करीत. आपल्या माणसाच्या विरुद्ध असलेली बातमी दडपणे असा प्रकार आढळत नसे, त्यांनी पायाभरणी केलेल्या एका कारखान्याच्या मालकाने वर्षभरात काही अफरातफर केली. पोलिसातून ती बातमी सकाळपर्यंत पोहोचणार याची त्याला खात्री होती. तो सकाळ कचेरीत येऊन उपसंपादकाला ती बातमी देऊ नका असे सांगू लागला. नानासाहेबांचा वशिला आहे म्हणून आडून सूचित केले. उपसंपादकाला आपला संपादक कसा आहे याची पूर्ण खात्री होती. त्याने या गृहस्थाला 'बातमी येणारच' म्हणून सांगितले. तेव्हा तो तडक आतल्या केबिनमध्ये गेला. पाच मिनिटांनी पुन्हा येऊन 'संपादकसाहेबांनी ती बातमी प्रसिद्ध करू नका म्हणून सांगितले आहे' म्हणून सांगू लागला. पण तेवढ्या वेळात नानासाहेबांचा निरोप उपसंपादकाला मिळाला होता, 'बातमी

प्रसिद्ध झालीच पाहिजे !'

कधी कधी गमतीदार प्रसंग निर्माण व्हायचे. नानासाहेब एका कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गेले होते. कार्यक्रम संपून बातमी लिहीपर्यंत रात्रीचे अकरा वाजले होते. इतर महत्त्वाच्या बातम्या होत्या, म्हणून उपसंपादकांनी ही बातमी आणि फोटो 'उद्या वापरा' म्हणून फाईलमध्ये ठेवून दिला. दुसऱ्या दिवशी इतर सर्व स्थानिक दैनिकात नानासाहेबांचे भाषण, पण सकाळमध्ये शून्य. कचेरीत आल्यावर ते वृत्तसंपादकांना एवढेच म्हणाले, 'तुमच्या उपसंपादकांना माझे भाषण महत्त्वाचे वाटत नसेल तर त्या कार्यक्रमाचा निदान फोटो तरी आज छापा.'

त्यांच्या अनेक विचारांशी आम्ही सहमत नसू. संपविरोधी धोरण, अमेरिकेला अनुकूल विचारसरणी किंवा दैनिकाची सजावट असे अनेक विषय. पण त्याला इलाज नसतो हे ठाऊक होते. शिकस्त करूनसुद्धा त्यांच्या मनाविरुद्ध घडत असे.

पृथ्वीवर नियंत्रण असलेले ल्युनोखोड चंद्रावर उतरले त्या रात्री मी रात्पाळीला होतो. मला ती बातमी मोठी वाटली म्हणून जेष्ठ सहकाऱ्याला आठ कॉलमी मथळा द्यायला सुचविले. दुसऱ्या दिवशी 'यात रशियाने काय मोठा पराक्रम केला? अमेरिकेने या आधी माणूस उतरविल्याचे माहीत नाही का? अशी सुनावणी झाली. इतका प्रखर रशिया–किंवा कम्युनिस्ट विरोध.

सर्वसामान्य जनतेत क्रांती करण्याचे ध्येय कम्युनिस्टांसारखेच त्यांचेही होते. पण त्यांची पद्धत वेगळी होती. त्यांना सामाजिक जागृती हवी होती. सकाळद्वारे ते राजकीय मार्गदर्शनापेक्षा सामाजिक प्रगती-अधोगतीचे दर्शन समाजाला देत. आतापर्यंतच्या तेजस्वी मराठी पत्रकाराच्या परंपरेपेक्षा हे स्वरूप एकदम वेगळे होते. केसरी-मराठाकार टिळकांना तेल्या–तांबोळ्यांचे पुढारी म्हणत. माझ्यासारख्या आधुनिक पत्रकार बनण्याची स्वप्न पहाणाऱ्याला टिळक पत्रकारापेक्षा राजकीय जागृती करणारी थोर विभूती वाटते. लोकमान्य किंवा आगरकर, परांजपे, खाडिलकर केळकर प्रभृतींना हवे असलेले स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्वसामान्य जनतेला आवश्यक असलेल्या मूलभूत बाबी मिळवून देण्यासाठी जीव ओतून झगडणारा पत्रकार म्हणून नानासाहेबांचे जीवन अवतरले आणि संपले. संत तुकारामाने ज्या अर्थाने रंजल्यागांजल्याच्या अंतःकरणाला हात घातला त्याअर्थाने परुळेकरांनी टांगेवाल्यासारख्यांना जवळ केले. गीतेची थोरवी वर्णन करता करता ज्ञानेश्वरांची आवश्यकता नाकारता येत नाही तसं टिळक–आगरकरांची लेखणी श्रेष्ठ मानताना नानासाहेबांचे पत्रकारित्व दुय्यम मानता येत नाही. यादृष्टीने ते खरे तेल्यातांबोळ्यांचे पत्रकार.

समाजसेवा करताना वर्तमानपत्राचा व्यवसाय तोटचात चालावा असं थोडंच आहे? 'सकाळ'कारानी आतापर्यंत मराठी वृत्तपत्रक्षेत्रात अशक्य असलेली गोष्ट शक्य करून दाखविली. त्याला

कारण अमेरिकेत घेतलेले या व्यवसायाचे प्रशिक्षण असले वा दैनंदिन जीवनाला लावून घेतलेली शिस्त असेल. पण उच्चभ्रू म्हणविली जाणारी मराठी मंडळी 'सकाळ'ची टिंगल करीत करीत या आगळ्या दैनिकाला वाचत. शिकल्या सावरलेल्यांना हव्या असलेल्या देशी-परदेशी बातम्या, व्यापाऱ्यांसाठी बाजारभाव, कॉलेज युवकांसाठी खास सदर, शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन, गोंधळून गेलेल्यांना उषा वहिनींचा सल्ला किंवा प्रौढसाक्षरांसाठी मोठ्या टायपात लहानसे सदर याच दैनिकात आढळेल. सकाळचा खप लाखावर म्हणजे –– वाचक आणखी त्यापटीत वाढलेला. सोप्या सरळ धोपट भाषेची, काव्यमय लेखांचे वावडे असलेला असाहित्यिक सकाळ वाचकात किती प्यारा आहे याचं एक उदाहरण बोलकं आहे. वृत्तपत्र विक्रेत्यांनी संप केला तेव्हा परुळेकरांनी सकाळी कोपऱ्या कोपऱ्यावर टॅक्सी उभी करून वाचकांना तेथून अंक न्यायची विनंती केली. खपात थोडा देखील फरक पडला नाही !

नागरी संघटनेत किंवा इतर बाबतीत राजकीय धोरण चुकले असले, संयुक्त महाराष्ट्र विरोधी भूमिका घेतली असली, सिनेमाच्या जाहिराती बंद केल्या असल्या, सकाळ पुरस्कृत-हमखास पराभूत असा समज रुढ असला, वेळोवेळी दैनिकाची होळी झाली असली तरी सकाळ लोकप्रिय राहिला यात नानासाहेबांच्या आधुनिक पत्रकारितेचा मोठा विजय मी मानतो. त्याला कारणही अगदी साधे आहे. कुणी बडा मंत्री पुण्यात भाषण करणार होता, त्यावेळी मंडईचे बाजारभाव आणायला जावे की हे भाषण ऐकावे असा पेच तेव्हा ड्यूटीवर असलेल्या बातमीदाराला पडला होता. नानासाहेब त्याला म्हणाले होते, "मंत्र्यांच्या भाषणात सर्वच वाचक रस घेत नाहीत. पण मंडईचे बाजारभाव सर्वांना हवे असतात. तेव्हा आधी मंडईत जा !"

यात सर्व काही आले.

नव्या समाजाला सर्वांनी, सर्व पत्रकारांनी, शिकविण्याची गरज नाही, हा पत्रकारितेचा नवा दृष्टीकोण माझ्यासारख्या अनेक व्यावसायिक पत्रकारांना नानासाहेबांनी शिकविला. त्यांनी 'मराठ्या'सारख्या राजकीय मोहिमा लढविल्या नाही. यलो जर्नालिझमला जवळपास फिरकू दिले नाही. पुण्यातीलच इतर स्थानिक वर्तमानपत्रे आपसात खेळत असलेली क्षुल्लक युद्धे लढविली नाहीत. इतर वर्तमानपत्रे जाहीरपणे सकाळची रेवडी उडवत असताना त्यांना भीक घातली नाही. बदलत्या काळातील हा मोठा स्वागतार्ह बदल.

सर्वसामान्यांची सुखदुःखं, अडीअडचणी, गरजा किंवा इच्छा आकांक्षा यांना वाट करून द्यावी परुळेकरांच्या सकाळनेच. पहिल्या पानावर एखाद्या वाचकाचे बोलके पत्र प्रसिद्ध करून आत संपूर्ण अर्धे पान वाचकांच्या पत्रव्यवहाराला राखून ठेवणारे हे बहुधा एकमेव पत्र. जनतेवर अशी पकड असणारा हा बहुधा एकमेव पत्रकार.

पत्रकारितेचे व्यसन लागलेला हा माणूस विलक्षण झपाटलेला असावा. 'स्वराज्य' साप्ताहिक राज्यभर लोकप्रिय केले, सकाळचा जम इतका छान बसविला, मग सत्तरी उलटल्यावर 'मुंबई सकाळ'चा हव्यास कशाला? शरीर कमकुवत असूनही या दुर्दम्य आकांक्षेच्या जोरावर नवे साहसही अंगावर घेण्याची कुवत फक्त नानासाहेबांतच.

अखेरच्या क्षणापर्यंत या झपाटलेल्या पत्रकर्त्याच्या नसातून रक्ताऐवजी शाईच वहात असावी. त्यांच्याकडे सध्या असणारा अनिल टाकळकर मला सांगतो आहे :

अंथरुणावर खिळलेल्या नानासाहेबांना भेटायला गेलेले वृत्तसंपादक मुणगेकर कितीतरी वेळ त्यांच्या योजनाच ऐकत होते. शेवटपर्यंत त्यांच्या काहीतरी नव्या योजना तयार होत होत्या. 'नानासाहेब तुमची प्रकृती कशी आहे' असं कितीतरी वेळा मुणगेकरांच्या ओठावर येत होतं. पण या बहाद्दराला भान होते कुठे ! विकलांग देह थकला असेल, पण शाई कुठे सुकली होती ?

□ □ □


माझ्या मनात एकच प्रश्न रुजतो आहे.
महात्मा गांधी, शिवाजी, मार्क्स आणि हा पंढरीचा विठोबा यांच्याशी मी कुठल्या धाग्यांनी जखडला गेलो आहे?

क्रांतीवीर नाना पाटील यांचे
'मृत्युंजय'कार शिवाजी सावंत यांनी घडवलेले
एक वेगळेच दर्शन

माणूस

२६ जानेवारी विशेषांक
किंमत : एक रुपया
आकार नेहमीचा
पृष्ठे : सुमारे शंभर



मुक्काम : कळंब
(जिल्हा उस्मानाबाद)
खेळ : १६ मिनिटांचा
खर्च : ५० हजारांचा
नेपथ्य : दुष्काळाचे

# चार दृश्ये

निळू दामले

**मी,** इंदिरा गांधी

– माझे फोटो लाखो पोस्टर्सवर, माझेच हात बळकट करण्यासाठी छापलेले तुम्ही ७१ साली पाहिलेच असतील.

तुमच्या महाराष्ट्रात दुष्काळाची पाहणी करण्यासाठी मी आले आहे. थोड्याच वेळापूर्वी माझे आंबेगावला भाषण झाले. आणि तुमच्या कळंबला ह्या खडीकेंद्राला भेट देण्यासाठी आले आहे.

वसंतराव नाईकांनी प्रथम दुष्काळ माझ्यापासून लपवून ठेवला होता. पण ज्यावेळी भूकबळी जाण्यापर्यंत पाळी

आली त्यावेळी सारख्या फेऱ्या दिल्लीत होऊ लागल्या. पैशाचा तगादा लावू लागले.

नाईकांपासून सत्पथींपर्यंत, माझ्या ह्या सहकाऱ्यांनी राजकारण सोडता विशेष काही केलेच नाही. संकटाच्या वेळी फक्त माझ्याकडे धाव घेतात. माझ्या शब्दातच मुळी जादू आहे. भाषण केल्यावर ह्या देशातली गरिबी हटू लागली आहे, समाजवाद अगदी उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. तुमच्या चव्हाणांनी नाही का महिन्यापूर्वी सांगितले की इंदिरा गांधी सर्व संकटाचा सामना करायला समर्थ आहेत. पहिल्या पहिल्या ते थोडीशी पुंडाई करण्याचा प्रयत्न करत होते. पण आता माझ्या आज्ञा ते अगदी बिनबोभाट पार पाडतात. येव्हढी ताकद माझ्यात आहे

मी दुष्काळातून तुम्हा सर्वांची सुटका करणार आहे इतरांनी काहीही केले नाही तरी माझे भाषण पुरेसे आहे. चिंता करू नका बरे म्हटले तर १५–२० मिनिटांचा हा कार्यक्रम आहे. पण त्यासाठी मी तीन हेलीकॉप्टर्स घेऊन आले. बरोबर दोन मंत्रीही आणले. हा खर्च करून मी तुमच्या दारिद्र्याची पहाणी करायला आले आहे, त्यावरून मला किती कळवळा आहे ते जाणून घ्या माझ्या अत्यंत महत्वाच्या अशा ह्या सभांची व्यवस्था करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे एक उच्च अधिकारी श्री. सुब्रह्मण्यम ह्यांनाही आगाऊ दोन दिवस हेलीकॉप्टरने पाठवले होते. तुमची भाषण ऐकण्यासाठी कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी किती काळजी घेतली आहे पहा. कामात निष्णात अशा अधिकाऱ्याला पाठवून मला सर्व माहिती मिळवता आली असती. पण तुम्हाला भेटल्यावाचून राहवेना म्हणून एव्हढा खटाटोप मी केला. आचेगावला तर आपल्या महाराष्ट्र शासनाने ह्यापेक्षाही उत्तम व्यवस्था ठेवली होती. २० टँकर्स आणि दोनशे बैलगाड्यांनी पाणी पुरवठा केला होता. त्या दुष्काळी जिल्ह्यात (सोलापूर) पाण्याचे दुर्भिक्ष असतानाही किती पाणी उपलब्ध करून दिले त्याचा विचार करा. ह्या सभांसाठी इतरही बाबींवर खूप पैसा खर्च केला आहे. इतकी मी आता दुष्काळ हटवण्यासाठी कृतनिश्चयी आहे. तेव्हा तुम्ही आता काळजी करू नका. सर्व काही ठीकठाक होईल.

जयहिंद. ◻

मी शंकर अर्जुन खलघरे.

कळंबच्या ह्या खडीकेंद्रावर २ महिने माझी म्हातारी, सून, मुलगा व त्यांच्या पोरांसह काम करतो आहे. बाई आल्या केव्हा-गेल्या केव्हा पत्ताच लागला नाही. आमचे येथे फार हाल होत आहेत. पाण्याची गाडी आली की सर्व लोक गर्दी करतात आणि पाणी घेऊन जातात. आम्हा म्हाताऱ्यांना पाणी मिळत नाही. रिकामे भगुणे घेऊन बसावे लागते. सत्तरीच्या जवळ आलो आहोत. हात थकले आहेत. काम होत नाही. पण तुकड्यासाठी काम करावेच लागते.

औषध-पाण्याची व्यवस्था नाही साहेब. एक माणूस आठवडयातून एक-दोनदा येऊन नुसते आयोडीन फिरवून जातो समोरच्या झापाच्या शेड्स आणि त्यातले २।३ डॉक्टर आज इंदिराबाई येणार म्हणूनच आले होते. शेड आणि डॉक्टरांचा केंद्र सुरू झाल्यापासून पत्ताच नव्हता.

हा रस्ता परवा रात्री ३ वाजेपर्यंत जागून आमच्याकडून करवून घेतला. पूर्वी इथे नुसते खडीचे ढीग असायचे. पोरे त्यातच अडखळायची, धडपडायची, लागायचे. मलाही दोनदा लागले. रस्ता, शेड्स पाहून इंदिराबाई समाधान व्यक्त करून गेल्या.

ह्या आठवडयाचा अजून पगार झाला नाही. पोटात अन्नाचा कण नाही; पाण्याचा थेंब नाही. ज्यावेळी पगारी होते त्यावेळी दुकानात जवारी नसते आणि जवारी असते त्यावेळी खिशात पैका नसतो.

जीव मेटाकुटीला आला आहे. मेलो-तर बरे असे वाटायला लागलं आहे.

साहेब, पेपरात माझं नाव छापू नका. मला कामावरून हाकलून देतील, उपाशी मारतील पोरंबाळं ! ◻

मी नागर बाई.

पोरावळांसह ह्या खडीकेंद्रावर काम करते. इंदीराबाईंनी जीपमधून फेरी मारली तेव्हा माझ्यासमोर थांबल्या. मी नमस्कार केल्यावर त्यांनी नमस्कार केला. कसे आहे विचारल्यावर मी माझे घट्टे पडलेले हात दाखवले. आम्हाला ५।। रुपये भावाऐवजी ५ रुपयच्या भावाने मजूरी देतात म्हणून सांगितले. पोटावर हात ठेऊन लई हाल होतात म्हणून सांगितले. बाईसाहेबांनी ऐकून घेतले आणि पुढे गेल्या. त्या गेल्यावर लगेच दोन पोलीसांनी माझ्यावर झडप घातली, खरे का सांगीतलेस म्हणून अर्वाच्च शिवीगाळ केली. मेले मला सर्वांच्यासमोर नाही नाही ते बोलले. बाई माझ्याशी बोलल्या म्हणून माझे भाग्य उदयाला आले असे मला वाटले. पण प्रत्यक्षात हे पोलीसच अंगावर आले. आता मला कामावरून काढून टाकतील की हो...... ◻

एक पत्रकार.

इंदिरागांधींचा कार्यक्रम पहावा म्हणून जायचे ठरवले तर बसच नाही. लातूर स्टँडवर सर्व बसेसचे आगाऊ रीझर्वेशन झालेलं. मोटर सायकल, मोटार, जीप कोणतेही वाहन मिळायला तयार नाही. सर्व ओघ कळंबकडे. किती तत्परता ! किती लगबग.

वाटेत ढोकीपासून थेट कळंबपर्यंत दुतर्फा रस्त्याच्या, काम करणारे उघडे वाघडे लोक दिसत होते. ६।७ मैला-वरून दररोज भाकरी तुकडा घेऊन हे लोक तान्ह्या मुलांसह दुष्काळी कामावर येतात.

कळंबला पोचलो तर तेथे काय थाट ! पन्नासएक अँबासडर-फियाटी तेथे उभ्या. गावात गेलेल्यांची गणतीच नाही. हेलिकॉप्टर मधून इंदिराजींना मजूरांच्या आधी ह्या गाडयाच दिसल्या

असतील. कोळपून गेलेल्या मजूरांच्या तुलनेत त्या एकदम चकाचकीत आणि सुरेख दिसत होत्या.

लातूरचे सर्व पुढारी पोचले होते आपापल्या गाड्यांतून, परीट घडीच्या कपड्यानिशी.

ह्या लोकांच्या डोळ्यात गरीबां विषयीचा तिरस्कार सोडून काहीही कधीही पाहायला मिळाले नव्हते. आज बरोबर येऊन ठेपलेत. एक आमदार. आय. टी. आय्. च्या दुष्काळ-ग्रस्त विद्यार्थ्यांना, सवयीनुसार ५ हजार रुपये देतो, असे आश्वासन देऊन बसले होते. पैसे काही दिले गेले नाहीत. पोरे पाठी लागली. कॉलेजमधून होणाऱ्या समारंभात हुर्रेवडी उडवू लागली. आमदारांनी तत्परतेने रिव्हॉल्व्हरचे लायसन्स काढून टाकले म्हणतात! हेही हजर होते. गाडीसह.

ह्या तापत्रापाठोपाठ, निरनिराळ्या सरकारी खात्याच्या किमान ३५ जीप्स होत्या. आणि त्यांच्या बाजूला ९ मोठ्या पोलीस व्हॅन्स आणि ३ जीप्स होत्या. काँग्रेसच्या झेंड्याच्या ट्रक्स होत्या, वक्रळ मोटार सायकली होत्या. रणांगणावर रणगाडे, तोफा, जीप्स लावून ठेवतात तसाच प्रकार भासला.

प्रत्यक्ष मैदानावर मुंबई—पुण्यासारखीच बांबू गाडून सभेची व्यवस्था केली होती. एक भव्य स्टेज होते. हे स्टेज लोखंडाच्या अँगल्स, गर्डर्सनी वेल्डींग-करून तयार केले होते. खूप लांबून विजेची व्यवस्था एक मोठा पोल रोऊन केली होती. स्टेज होते ढोकीच्या साखर-कारखान्याने दिलेले. हा कारखाना गरीबी हटवण्यासाठी कटिबद्ध असल्याने, त्यांनीच गरीबी हटवण्यासाठी—दुष्काळ हटवण्यासाठी केलेली ही अलशी मदत होती.

खडी केंद्रावर एक मोठा शामीयाना होता, पाण्याचे घडे ठेवले होते, ताज्या ताज्या शेड्स होत्या त्यावर 'लहान मुलांसाठी निवारा' 'प्रथमोपचार केंद्र' अशा पाट्या होत्या. त्यावरचा रंगही कदाचित वाळलेला नसवा. व्यवस्था मोठी प्रेक्षणीय अशीच होती. जेथे हेलीकॉप्टर्स उतरणार होती तेथे पोलीसांच्या आणखी ४ मोठ्या गाड्या आणि १५ जीप्स होत्या. १०।१५ सरकारी खात्यांच्या मोटरी इथेही होत्याच. पोलीसांच्या राहुट्या पुन्हा इथे युद्धाची आठवण करून देत होत्या.

प्रत्यक्षात साईटवर न जाता लॉग-बुकात 'जाऊन आलो' अशी नोंद करून जीप मात्र इतर घरगुती कामासाठी वापरणारे सरकारी अधिकारी आज मात्र 'साईटवर' हजर झाले होते. वेगवेगळ्या बांधकामावर कंत्राटदारांकडून २ टक्के, अर्धा टक्का अशा टक्केवारीने पैसे खाणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना आज मात्र लगबगीने 'प्रत्यक्ष कामावर' हजर राहताना पाहिल्यावर मजा वाटली.

नांदेडपासून पोलीस आलेले. साधारणपणे ७५ गाड्यातून आणि त्यांची संख्या किमान १५०० च्या घरात. सकाळी ५ पासून राबत होते.

इंदीराजी आल्या त्यावेळी लातूरचे

एक माजी आमदार स्टेजवरून इंदीरा गांधींचा जयजयकार लोकांकडून करवून घेत होते. हे मध्यंतरी नाहीसे झाले होते. लातूर डिव्हिजन आंदोलन ह्यांनी उचकवले होते, त्या आंदोलनाचे हे पुढारी होते. गोळीबार झाला. २ विद्यार्थी मारले गेले. लातूरात ह्या महाराजांच्या शोधात विद्यार्थ्यांनी सोडलेली गाढवे फिरू लागली. महाशय हादरले. घनगर्जना करणारे मालक एकदम गायब! आज त्यांचे दर्शन जिल्हावासीयांना एकदम कळंवलाच झाले. घसा कोरडा करत होते. किती हा जनतेचा कळवळा! ही सभा सरकारची, दुष्काळी कामाची पहाणी करण्याची, की पक्षाची होती असा संभ्रम पडावा इतकी जोरजोरात इंदीरा गांधी झिंदाबादची नारेबाजी चालली होती. काही विशाल महिला फटाफट फोटो काढत होत्या. डाव्या बाजूला पसरलेल्या कारुण्याचे नव्हे तर उजवीकडे असलेल्या उत्साहाचे. डावीकडे होते खडी केंद्रावरचे काळेशार मजूर. उजवीकडे होती सुहास्य वदनाची, तोंड फाटून जाईल की काय अशी भीती वाटावी असे हसणारी मंडळी.

सगळीकडे आनंदी आनंदच दिसत होता. टाळ्या दिल्या जात होत्या. मंडळी मजेत होती. समारंभ लग्नासारखाच भासावा. पुढारी मंडळी अगदी कसे काय चालले आहे, तुमची बब्डी कशी आहे, नवीन फ्रीज घेतलातका, वा, छान, आमच्या गाडीचे स्पेअर पार्टसच मिळत नाहीत, फार महागले आहेत असा चर्चेचा सूर होता.

एक वर्ष लातूर नगरपालीकेची निवडणूक पुढे गेल्याने काही मंडळी खुषीत. दुष्काळच तेवढाच फायदा, भत्ते आणि न सांगता येण्यासारखे फायदे आणखी एक वर्ष खिशात!

एक आमदार आपला डोळ्यावरचा गॉगल, भुरु भुरु उडणारे केस सावरत, कोटाच्या बटणांशी चाळा करत विजयी मुद्रेने इथे तिथे पहात आहेत. आपण अगदी 'हीरो' दिसत आहोत ह्याची त्यांना नक्की खात्री असावी. हसत हसत लोकांचे नमस्कार घेत होते. कोण कशासाठी, तर कोण कशासाठी खुशीत होते.

सगळीकडे उत्साह होता, हास्याची कारंजी उडत होती, मजा होती. नव्हती फक्त चिंताच.

इंदीराजी आल्या. लोकांना हेलीकॉप्टरचे फारच कुतूहल. 'इंदीराबाई-म्हणजे काही म्हणा, पण पॉवरफूल खऱ्याच.' एक शिक्षक गहिवरला. आता भारतीय आरमाराचे हेलिकॉप्टर असणे म्हणजे पॉवर नाही तर काय?

आल्यावर लगेच नमस्कार चमत्कार. जीपमधून ७।८ मिनीटांची फेरी खडी केंद्राला. १।२ ठिकाणी जुजबी चौकशी. नंतर सरळ स्टेजकडे.

आपल्याकडे मदत करायला आल्या आहेत. दुष्काळाची परिस्थिती पाहण्यासाठी आजारी असूनही आल्या आहेत. त्यांचे स्वागत करतो...वसंतराव नाईक. २।३ मिनिटात स्वागत समाप्त.

नंतर इंदीराजींचे २।३ मिनिटांचे

भाषण...

महाराष्ट्राची जनता हिंमतवान आहे, मेहनती आहे...मदत करण्याच्या प्रयत्नात आहोत...समाजवाद.. गरीबी...

लगोलग खाली उतरून हेलीकॉप्टरकडे रवाना. आभार प्रदर्शनाचे भाषणही ऐकायला थांबल्या नाहीत.

हेलीकॉप्टर्स उतरायला आणि उडायलाच खरे म्हणजे जास्त वेळ लागला.

१५ मिनिटाच्या आत सगळीकडे सामसूम झाली. धुराडे सोडत गाड्या गायब. पुढारी गायब.

नंतर काही तास खडीकेंद्रावर फिरलो. मजूरांना भेटत. त्यांच्या तक्रारी ऐकत.

दैन्य बोलत होते. अस्थिपंजर हलत होते. आवाज येत होता म्हणून बोलत होते असे म्हणायचे. आज आणि काल आम्हाला सर्व सोयी मिळतात, पगार बरोबर व वेळेवर मिळतो म्हणून सांगा, वेगळे काही बोललात तर आमच्याशी गाठ आहे. असा धाक घातल्याचे सर्वजण सांगत होते. त्यांच्यात नागरबाईही होती. सर्वच स्त्रियांची प्रतिक्रिया होती, 'आमचे फार हाल होतात. आमचा कोणी वाली उरला नाही. काही तक्रार करावी तर अंगावर येतात.' एका खडीच्या खोक्याला ५॥ रुपये द्यायला हवेत पण कधीच ५ रुपयापेक्षा जास्त दिलेले नाहीत ही तक्रार प्रत्येकजण करत होता.

औषधाच्या केंद्रावर विचारले तर 'आम्ही दोन महिन्यापासून इथे औषधपाणी देत आहोत' असे कर्मचाऱ्यांनी सांगितले. मजूर मात्र म्हणतात की हे लोक कालच आलेत. कालपर्यंत नव्हते. इथली सर्व व्यवस्था कालच झाली असा गिल्ला केंद्रावरची लहान पोरेही करत होती. पैसे खाण्याच्या विविध क्लृप्त्या,किस्से एक तरुण सांगत होता. तक्रार केली तर उपाशी मरेन म्हणून सांगत होता. केंद्राची माहिती देणाऱ्या फलकावर नोंदल्याप्रमाणे सर्व गोष्टी 'आज' अस्तित्वात आल्या होत्या, कालपर्यंत नव्हत्या.

लाऊडस्पीकरचे कंत्राटदार भेटले, १५०० रुपयाला कंत्राट घेतले होते म्हणाले.

उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे २ ओव्हरसीअर्स आणि एक डेप्युटी इंजिनियर आणि इमारत व दळणवळण खात्याचे ४ ओव्हरसिअर्स व दोन डुप्युटी इंजिनीअर्स एक आठवडा ह्या सभेच्या तयारीसाठी राबत होते. ३५० च्यापेक्षा जास्त मजूरांसह ! प्रत्यक्ष दुष्काळी कामावर मात्र इंजिनीअर्स–ओव्हरसिअर्स कमी पडत आहेत. आसपासच्या गावातून शंभर ते सव्वाशे कोतवालही तहसीलदारांनी आजच्या दिवसासाठी आयात केले होते – चिल्लर कामासाठी.

अगदी किमान धरला तरी खर्च ५० हजाराचा. मिनीटाला ३ हजाराचा दर पडला.

दोन वाजायच्या आसपास सर्व बांबू, स्टेज उचकटायला सुरुवात झाली. उभारलेल्या झापाच्या शेड्सही उचकटन टाकणार असे एक कर्मचारी बोलला.

सभेचा, हास्याच्या कारंजांचा,

उत्साहाचा तत्परतेचा, लगबगीचा, कशाचाच मागमूस उरणार नव्हता. खुणा शिल्लक राहणार होत्या काळ-वंडलेल्या मजुरांच्या खडीकेंद्राच्या दारिद्र्याच्या, स्वस्तात सांडलेल्या घामाच्या.

परत जाताना आमदारांच्या हातात चंदनाचे हार पाहिले. इंदीराजींच्या स्वागताचे. हार मजेत उडवत आमदार निघाले होते. दुष्काळाच्या तडाख्यात सापडलेल्या दुर्दैवी शंकर अर्जूनची, कधीही मरेल अशी त्या सुरकुतलेल्या म्हाताऱ्याची विचारपूस करायला आलेल्या इंदीराजींचे स्वागत चंदनाच्या हारांनी. मरणासन्न पित्याला भेटायला येणाऱ्यांचे हे स्वागत. हसत खेळत. चंदनाच्या हाराने !

□ □

---


तूफान
कुर्बानी
आणि
शनवारवाड्यातील शमादान
ब. मो. पुरंदरे
यांच्या
तीन
कथांचा
संग्रह

राजहंस प्रकाशन
किंमत : साडेतीन रुपये


---

# आ ले पा क

■ मुंबई येथे झालेल्या संततीनियमनविषयक परिसंवादात, संततीनियमनाचे सर्वोत्तम साधन कोणते ? या प्रश्नाचे उत्तर देताना कोलंबियाचे डॉ. फर्नांडो टामायो म्हणाले: शिक्षण हे संततीनियमनाचे उत्तम साधन आहे.

आमच्या मते, नुसते शिक्षण नव्हे; सहशिक्षण !

■ विद्याधर गोखल्यांच्या नव्या 'स्वरसम्राज्ञी' नाटकाच्या एका परीक्षणात म्हटले आहे : गोखल्यांचे प्रासप्रेम, या नाटकातही, पुढील शब्दांवरून व्यक्त होते : बेछूट, बेपर्वा, बेमान, बेबंद, बदचाल, बदसूर.

बेफाम, बेकार, बेलगाम, बेजबाबदार, बाष्कळ, बिनबुडी बडबड !

■ दुसऱ्या कसोटी सामन्यात अखेर भारताने इंग्लंडवर मात केली. त्याबाबत बोलताना मुख्यमंत्री वसंतराव नाईक म्हणाले : माझा मुलगा चि. निरंजन याने भारत जिंकेल असे काल रात्री भाकीत केले होते.

हा मुलगा पुढे अंपायर झाला नाही म्हणजे मिळवली.

■ महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळातर्फे तयार झालेल्या 'धर्मकोश–राजनीती कांड' या ग्रंथाच्या दुसऱ्या भागाचे प्रकाशन साताऱ्याला नुकतेच उपराष्ट्रपती गोपालस्वरूप पाठक यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानावरून भाषण करताना यशवंतराव चव्हाण या प्रसंगी म्हणाले : वाईला दक्षिण काशी असे संबोधले जाते. तेव्हा पाठक दंपतीला आज काशीयात्राच घडली.

नुसतीच काशीयात्रा ? दक्षिण काशीचे काशीराम कोतवाल नाही भेटले ?

■ ठणठणपाळ, गो. नी. दांडेकर, मधु मंगेश कर्णिक, श्री. ज. जोशी.

'ललित' नभी मेघ चार !

■ कॉम्रेड बी. टी. रणदिवे एका भाषणात म्हणाले : मराठी मराठी करणारी शिवसेना हे कॉंग्रेसचेच पोर आहे.

औरस की अनौरस ?

■ चित्रवाणीवर नुकत्या झालेल्या एका परिसंवादात पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूटचे पदवीधर दीक्षित म्हणाले : चित्रपटकथालेखन करण्यापेक्षा लोणचं घालायला शिकलो असतं तर बरं झालं असतं.

भ्रम आहे तुमचा हा दीक्षित. तिकडे बेडेकर आणि ठाकूर कथालेखन सुरू करण्याच्या विचारात आहेत !

■ चित्रपटविषयक एका सदरात म्हटले आहे : कोणती नटी केव्हा बाळंतीण

होणार हे तिच्या नवऱ्याच्या आधी तिच्या चाहत्यांना माहीत असते.

आणि आपली आवडती नटी बाळंत झाली की तिची ही चाहतेमंडळी डिंक-अळीवाचे लाडू खातात.

■ केंद्रीय पर्यटनखात्याच्या राज्यमंत्री डॉ. सरोजिनी महिषींनी नुकतीच मुंबई-पुण्याची सफर केली. पुण्याच्या मुक्कामात, हवामान खात्याचे अंदाज हे वस्तुस्थितीशी सुसंगत असावेत, अशी अपेक्षा त्यांनी बोलून दाखवली.

हवामानखात्याकडून अचूक अंदाजाची अपेक्षा करणे आणि मंत्र्याकडून आश्वासनपूर्तीची अपेक्षा करणे—दोन्ही सारखेच बावळटपणाचे आहे.

■ याच मुक्कामात डॉ. महिषी म्हणाल्या : श्रीखंडाचा उल्लेख वैदिक वाङ्मयात आढळतो.

आम्ही वैदिक वाङ्मयाचे जे संशोधन केले त्यात श्रीखंडाचा तर उल्लेख आढळलाच; पण शिवाय, कलियुगात श्रीखंड चितळे-बंधूंकडे चांगले, घरगुती व खात्रीचे मिळेल, अशा आशयाची देखील एक वैदिक ऋचा आम्हाला आढळली.

■ घोडा चांगला असून भागत नाही; घोडेस्वारसुद्धा तसाच तरबेज असावा लागतो.

शिवाय खालची जमीनही मऊ आणि भुसभुशीत हवी.

■ महाराष्ट्राच्या गृहखात्याचे राज्यमंत्री शरद पवार यांनी विधानसभेत सांगितले : मुंबईतील गुंड आणि स्मगलर्स यांचे बृहन्मुंबईतून उच्चाटन करण्याचे सरकारने ठरवले आहे.

तरीच ही मंडळी आता विशेष निर्धास्त झालेली दिसतात बरं का !

■ प्राचार्य राम जोशी एका व्याख्यानात विचारतात : परीक्षा पेपर कठीण आला म्हणून बंड करण्यापेक्षा आजची शिक्षण-पद्धती चुकीची आहे म्हणून आमचे तरुण का नाही दंड थोपटत ?

ती वेळ येणारच आहे जोशीबुवा, तोपर्यंत आपली पाठ थोपटून घ्या तुम्ही.

■ कुत्रा कुत्र्याला खात नाही, अशी एक म्हण आहे.

पण साहित्यिक मात्र साहित्यिकाला खातो.

■ एक न्याय-न्यायदानतज्ञ म्हणतात न्यायाधीशाप्रमाणे वकीलही निःपक्षपाती असावा.

निःपक्षपाती वकील आणि माहेरचा कैवार न घेणारी बायको यांना परमेश्वराने अजून घडवलेले नाही. □

■ 'माणूस' साप्ताहिकाच्या नावावरून बरा-वाईट-चांगला माणूस, माणुसकी, माणसातून उठणे, माणसात येणे, माणसाळणे, माणूसघाणेपणा या कोट्या सहज करता येतात; म्हणूनच त्या केल्या नाहीत तर बरे दिसेल की काय, असा विचार फार वेळा मनात येतो. आता अगदी राहवलेच नाही तर गोष्ट

वेगळी. काय ?

■ कुटुंबनियोजन करा रे बाबांनो ! नाहीतर चंद्रावर फार गर्दी होईल.

□

## नवी तारका लिव्ह उलमान

अमेरिकेच्या चित्रपटक्षेत्रात एक नवी तारका उगवली आहे. पाहता पाहता तिने निर्माते दिग्दर्शक आणि प्रेक्षकांना भारून टाकले आहे. लिव्ह उलमान हे तिचे नाव. जेम्स हिल्टन या कादंबरीकाराच्या गाजलेल्या 'लॉस्ट होरायझन' या कादंबरीवर आधारलेल्या नृत्यसंगीतमय चित्रपटात लिव्ह प्रमुख भूमिका करते आहे; 'फॉर्टी कॅरॅट्स' या चित्रपटातील अवघड भूमिकेसाठी लिव्ह शिवाय दुसरी नटी चाललीच नसती, असे निर्माते माईक फ्रँकोविच यांचे मत आहे; शिवाय वॉर्नर ब्रदर्सतर्फे प्रकाशित होणाऱ्या एका ऐतिहासिक चित्रपटातील मध्यवर्ती भूमिकेसाठी त्यांनी लिव्हबरोबर करार केला आहे.

मात्र लिव्ह उलमान ही कोरी करकरीत नटी नाही. म्हणजे आत्री शाळामास्तरीण किंवा घरगुती गृहिणी असलेली बाई अचानक दिलखेचक नटी झाली, अशी काही लिव्ह उलमानची गोष्ट नाही. ती आपली अमेरिकन चित्रपटी दुनियेत नवी आहे इतकेच. तेथे पदार्पण करण्यापूर्वी इंगमार बर्गमन या विख्यात युरोपियन दिग्दर्शकाच्या चित्रपटातून लिव्हने महत्त्वाच्या भूमिका करून सर्वत्र वाहवा मिळवली होती. बर्गमनच्या चित्रपटातून नायिकेची भूमिका करताना प्रत्यक्ष जीवनात ती त्याची प्रिया झाली. बर्गमन आणि लिव्ह उलमान यांची रम्य प्रेमकहाणी कोणा जागरूक वाचकाला वाचणे असेल तर त्याने 'टाईम' साप्ताहिकाचा ४ डिसेंबर १९७२ अंक पाहावा.

खरे म्हणजे 'माणूस'च्या बिन-जागरूक-वाचकांसाठी मीच ती कहाणी सांगणार होतो. पण 'टाईम' साप्ताहिकाच्या पुढील अंकातून आलेल्या दोन पत्रांनी मला परावृत्त केले. म्हटले ती पत्रेच येथे द्यावी; म्हणजे हवे ते करायला वाचक मोकळे राहतील. ग्वाटेमाला शहराच्या राज्यपालांनी मि. जोस डी लिऑन यांनी लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे 'अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची अभिनेत्री लिव्ह उलमान आणि दिग्दर्शक प्रियकर इंगमार बर्गमन यांची मनमोकळी कहाणी मोहक आहे. चित्रपटव्यवसायातील एक देव आणि देवता यांची प्रेमकथा आहे ती.' मात्र लॉस एंजेलसच्या बॉब एस्. फेल्ट्स यांनी चिडून लिहिले आहे 'लिव्ह उलमानच्या बदफैलीचे तुम्ही जे उच्छृंखल आणि अवास्तव उदात्तीकरण केले आहे त्याची मला किळस आली.'

तात्पर्य :

ते ज्याचे त्याने काढावे. ते बरे.

□ □ □



# ऐने बाबारीतील ध्वनित अर्थ

अनिल बर्वे

—तसं पाहता अगदी लहानपणचं कोणालाच आठवत नाही. म्हणून मलाही आठवत नाही. तरी पण अगदी प्रांजलपणे सांगायचंच झालं तर, तेव्हा दात असते तर निश्चित चावलो असतो तिला.

माझा जन्म झाला आणि आईच्या उदरातील संरक्षित जागा सोडून या उंघडचा जगात येऊन पडल्यामुळे मी थोडा भयभीतच झालो होतो. तोच त्या नर्सनं माझ्या पाठीत हलकेच धपाटा मारला. माझा जीव थोडा कासावीस झाला. इवल्याश्या नाजूक नाकपुड्या फुलल्या आणि मी एकदम टॅह्याऽऽ टॅह्याऽऽ रडायला सुरुवात केली.

वस्तुतः मी टॅह्याऽऽटॅह्याऽऽरडलो यात विशेष काही केले अशातला मुळीच भाग नाही. जन्माला आल्यावर प्रत्येक मूल रडते. मार्क्सदेखील रडला होता. माओदेखील रडला होता. मोझेसदेखील रडला होता. योहानदेखील रडला होता. मग मी रडलो यात नवल ते काय?

—पण नवल हे की, रस्त्याने चालले

होते चार विद्वान. त्यांनी माझे रडणे ऐकले मात्र, नि कधी नव्हे ते त्यांच्यात झाले एकमत. माझ्या टँह्या ऽऽटँह्या रडण्यातून त्यांना विशिष्ट ध्वनीत अर्थ ऐकू आला. मग ते चार विद्वान लगबगीने वर आले. सेमीनारला आल्याप्रमाणे माझ्याभोवती उभे राहिले नि त्यांनी माझ्या टँह्या ऽऽटँह्याऽऽ रडण्यातून ध्वनीत अर्थ काढला–

"कोहं. कोहं. मी कोण आहे ? मी कोण आहे ?"

मग एक विद्वान पुढे आला नि माझ्या कानात कुजबुजला–

"तू स्वतंत्र सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक भारताचा एक जबाबदार घटक आहेस. घटनेप्रमाणे तुला विचार–आचार – उच्चार – संचार – व्यवसाय स्वातंत्र्य दिले आहे. वयाच्या एकविसाव्या वर्षी तू तुझ्या मर्जीप्रमाणे या देशाचे सरकार निवडून देऊ शकशील आणि विशेष म्हणजे कायद्याने तुझ्या जीवित वित्ताची हमी घेतली आहे."

मला वित्ताची मुळीच काळजी नव्हती. कारण माझ्या मालकीची होती केवळ चार दुपटी आणि ती मी इतक्या वेळी खराब करी की, ती कोणी चोरायचा प्रश्नच नव्हता. येऊन जाऊन राहिला जीव. अन् माझ्या जीवाच्या संरक्षणाची हमी तर स्वतंत्र सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक भारत सरकारने घेतलेली. मी डोळे किलकिले करून कॅलेंडर पाहिले. १७ जुलै १९४८. म्हणजे देश स्वतंत्र होऊन अकरा महिने दोन दिवस झाले होते. मला जरा बरे वाटले.

इकडे सरंजामी संस्कारात वाढलेल्या माझ्या मध्यमवर्गीय बापाला पुत्ररत्न झाल्याचे समजताच फार आनंद झाला. त्याने मग आप्तेष्टांना पेढे वाटले नि दुचाकीवरून तो लगबगीने पुणे नगरपालिकेच्या जन्म मृत्यू नोंदणी कार्यालयात गेला. मग– "प्रचंड लालफितीत बांधलेल्या स्वतंत्र–सार्वभौम–लोकशाही –प्रजासत्ताक–भारत सरकारच्या प्रचंड फाइलीत एका लोअर डिव्हिजन क्लार्कने आपल्या किरट्या फराट्या अक्षरात माझे नाव नोंदवले."

–त्यामुळे काय झालं, दोन गोष्टी झाल्या.

एक म्हणजे माझ्या अस्तित्वाला कायदेशीर पुरावा प्राप्त झाला आणि दुसरे म्हणजे माझ्या बापाच्या स्वैपाकघरातील पोतंभर भांड्याकुंड्यांचा नि बाहेरच्या खोलीतील ट्रंक भरून सामानाचा मी कायदेशीर वारस ठरलो. तर ते असो.

पुढे मी तीन–चार महिन्यांचा झालो आणि स्वतःहून उलथ्याचा पालथा पडू लागलो. तेव्हा माझ्या तरुण आणि सुंदर आईला इतका म्हणून आनंद झाला की, ती मला वेडवायला काय लागली, हसायला काय लागली टाळ्या काय वाजवायला लागली, काही विचारू नका.

त्याच काय आहे– माझी आई आहे थोडी वेडसर. म्हणजे काय – 'मी स्वतंत्र-सार्वभौम-लोकशाही प्रजासत्ताक भारताचा एक जबाबदार घटक आहे'

याची तिला तेव्हा जाणीव नव्हती नी अजूनही नाही. ती आपली मला खेळणंच समजायची. नी माझे एवढे कोडकौतुक करायची की मला जीव नकोसा व्हायचा.

मी उलथ्याचा पालथा झालो तेव्हा वेडपटासारखे हसणाऱ्या आईला तेव्हाच मी सूचक इशारा दिला होता– "आये, आत्ता हसतीयस. उद्या रडशील!" पण माझ्या इशाऱ्यातले गांभीर्य माझ्या आईला समजले नाही. पण पुढे जेव्हा कॉलेजचा उंबरठा ओलांडल्यावर स्वतंत्र –सार्वभौम–लोकशाही प्रजासत्ताक भारताच्या समाज जीवनात एकसारखा मी तोंडघाशी पडू लागलो तेव्हा मात्र आई रडायला लागली. तर ते असो.

पुढे चालून मी दोन तीन वर्षांचा झालो. अर्थात मी --'स्वतंत्र सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक भारताचा जबाबदार घटक असल्याने उगाच बेजबाबदारपणे बोलणं मला पसंत नव्हतं. म्हणून आवश्यक तेवढेच मोजके शब्द मी बोलायचो. पण माझी वेडपट आई मात्र माझ्या ढेरीवर चापट मारून म्हणायची -- "बंब्या, काही बोलणार का नुसता मुकाच रहाणार?"

जेव्हा मी पाचसहा वर्षाचा झालो तेव्हा माझ्या वेडपट आईनं मोठ्या हौसेनं मला मुंजोबाच्या बोळातल्या एका कोंदट मुलांच्या कोंडवाड्यात नेऊन घातले नी आल्या गेल्याला — "आमचा बाबा आता मॉंटेसरीत जाऊ लागला" म्हणून सांगू लागली.

"मध्यमवर्गाला नी त्यात पुन्हा आपल्या सारख्या ब्राह्मणवर्गाला शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही होऽऽ, हे मी आईच्या उदरात असल्यापासून इतक्या वेळा ऐकलं होतं की त्यामुळे विशेष इंटरेस्ट नसतानाही मी देवनागरीतील मूळाक्षर गिरवायला लागलो. मग मी इयत्ता पास होत गेलो.

शाळेत मी प्रार्थना म्हणायचो.

–'देवा तुझे कीती सुंदर आकाश. सुंदर प्रकाश सूर्य देतो."

पण तो आमच्या चाळीला मात्र सूर्य प्रकाश देत नव्हता. डेक्कन जीमखान्यावरच्या बंगल्यांना मात्र सूर्य प्रकाश द्यायचा.

शाळेत मी धडा वाचायचो.

"हे आपले बापूजी. बापूजी चरखा चालवतात नी सूत कातताता. देशातल्या सर्व माणसांना घालायला कपडे नाहीत म्हणून ते पंचा नेसतात. म्हणून लोक त्यांना महात्मा म्हणतात."

पण पुढारी मात्र तलम मलमलचे कपडे घालतात. खेड्यापाड्यातले गरीब लोक मात्र लंगोट्या लावतात हे मला माहीत होते.

अशा रीतीने शाळेतील शिकवणूक एक नी व्यवहारातील शिकवणूक दूसरी. यामुळं झालं काय, 'स्वतंत्र सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक भारताच्या जबाबदार घटक' असलेल्या मला सिझोफ्रेनीया झाला. म्हणजे असं की— "टाळूपाशी कवटीचा सरळ उभा छेद घेतला तर एका अनिल उर्फ बाबा बर्वेचे दोन तुकडे पडतात." एका तुकड्याच्या डोळ्यातून चांदण्यांचे अश्रू

गळतात. दुसऱ्या डोळयातून क्रांतीच्या ठीणग्या उडतात. एका तुकड्याला साने गुरुजी- वी. स. खांडेकर आवडतात. दुसऱ्याला तूकड्याला वासूनाका— सखाराम बाईंडर आवडतात. थोडक्यात स्वतंत्र सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक भारताचा जबाबदार घटक असलेल्या अनिल बर्वेचा एक बेजबाबदार 'पब्लीक फालूदा' झाला. म्हणजे ज्या प्रमाणे पब्लीक वागू लागतं त्या प्रमाणे अनिल बर्वे वागू लागला.

म्हणजे काय करू लागला ?

—तर सत्यमेव जयते म्हणत असत्याची कास धरू लागला. सर्व पक्षोपक्षांच्या सभांना जाऊन माना डोलवू लागला. वर पुन्हा 'साला, मिलटरी रूल आला पाहिजे. मिलीटरी रूल' असे म्हणत मतपेटीत मत टाकू लागला. करप्शन फार वाढलंय असं म्हणत स्वत: करप्शन करू लागला.

अर्थात अनिल बर्वे, म्हणजे माझ्या वागण्याला फार मोठा सामाजिक आशय आहे. कारण मी पडलो तरुण पिढीचा प्रतिनिधी. म्हणजे त्याचं काय आहे, स्वातंत्र्योत्तर काळातील पिढी फक्त पुण्या-मुंबईतल्या सुशिक्षित पांढर-पेश्यांच्या घरातच जन्माला आली. अर्थात मीही पुण्यातल्या पांढरपेशा कारकूनाच्या घरात जन्माला आलो. त्यामुळे मी स्वातंत्र्योत्तर काळातल्या तरुण पिढीचा आपोआपच प्रतिनीधी ठरलो. त्यामुळे झालं काय,

वडिलधारे माझ्याकडे मोठ्या अपेक्षेने पाहू लागले. मग मलाही वाटलं काहीतरी करावं. मग मी काय करू लागलो—माझ्या जिनीयस दोस्तांच्या नादानं वागू लागलो. आमचे जिनीयस दोस्त कम्युनिस्ट झाले—मीही झालो, आमचे जिनीयस दोस्त म्हणाले, क्रांती केली पाहिजे—मी ही म्हणू लागलो आमच्या जिनीयस दोस्तांनी क्रांती केली नाही—मी ही केली नाही. आमचे जिनीयस दोस्त प्रेमात पडले—मी ही पडलो. आमच्या जिनीयस दोस्तांनी लग्न करून संसार थाटले—अन् तेवढेच बघा आपल्याला काही जमले नाही. म्हणजे संसार थाटून मार्गी लागायची इच्छा होती. पण बेकार असल्याने जमले नाही. प्रेमभंग झाला.

अर्थात आमच्या 'जिनीयस दोस्तांची संगत काही मी सोडली नाही. आमचे जिनीयस दोस्त वडीलधाऱ्यांना शिव्या देऊ लागले. मी ही शिव्या देऊ लागलो. पण आमचे दोस्त पडले धोरणी. ते आपले बेतावेताने शिव्या देत. मला तेवढा पाचपोच नव्हता म्हणून मी दणकून शिव्या घ्यायचो. त्यामुळे झालं काय—मी झालो जास्त पॉप्युलर अन् वडीलधारे माझ्याकडे जास्त अपेक्षेने पाहू लागले.

आमच्या दोस्तांनी उचापती सुरू केल्या. मी ही केल्या. आमच्या जिनीयस दोस्तांना वाटले—'देशातील अडाणी अशिक्षित जनतेत राजकीय जागृती घडवण्यासाठी दर्जेदार वैचारिक मासिक सुरू करवे' आमच्या जिनीयस दोस्तांच्या डोक्यात आले न आले तोच मी सुरू करून बंदही पडले. म्हणजे

त्याचं काय आहे—माझं माईंड आहे डायनॅमिक अन् पर्सनॅलीटी आहे डॅशींग त्यामुळे आपटलो तरी मी उसळी खातो. त्यामुळे फायदा माझाच होतो—कसं ते पहा.

इकडे आमचे जिनीयस दोस्त अडाणी अशिक्षित जनतेसाठी दर्जेदार वैचारिक मासिक सुरू करीत होते तेव्हा मी उचापती करून जाऊन पडलो तुरुंगात. तुरुंगात गेल्यामुळे बोंबाबोंब झाली—आपोआपच माझा भाव वधारला आणि काही एक कार्य न करता 'स्वतंत्र सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक भारतातल्या 'राजकारणात किंचित का होईना मला स्थान प्राप्त झाले. आता यापुढे मी जसजसे काहीही करणार नाही तस तसा मी मोठा मोठा पुढारी होईन. अन् जसजसा काहीही कार्य न करण्याइतका मी नालायक होईन तसा मी आपोआप 'स्वतंत्र सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक भारतातला सत्ताधारी होईन. त्तर ते असो.

इकडे स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सव झाला. देशात दुष्काळ पडला. तरुण पिढी अस्वस्थ झाली. दरम्यान 'स्वतंत्र सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताकाचा जबाबदार घटक' असलेला मी वडील धाऱ्यांना शिव्या देऊन, उचापती करून 'युयुत्सू तरुण बंडखोर' झालो. म्हणजे आहे की नाही मजा ?

स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षात तरुण पिढीच्या अस्वस्थ मनाचा मागोवा घेण्यासाठी— 'देशातल्या अडाणी अशिक्षीत जनतेसाठी दर्जेदार वैचारिक मासीक' सुरू केलेल्या संपादक दोस्ताने मला पत्र पाठवले— 'काहीतरी झणझणीत झकास लिहून पाठव. मानधनाची व्यवस्था केली आहे. याला म्हणतात धोरणीपणा. कारण त्या संपादक दोस्ताकडून मी पैसे काढणारच याची त्याला खात्रीच होती. मग मानधन दिल्याचे श्रेय तरी का गमवा ?

पण इकडे माझ्या पुढे पडला प्रॉब्लेम. प्रॉब्लेम का पडला, तर स्वतंत्र सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक भारतापुढे फक्त प्रॉब्लेमच पडतात. म्हणून मलाही पडला प्रॉब्लेम. कारण काहीतरी 'झणझणीत झकास' लिहायला अक्कल लागते. अन् स्वतंत्र सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक भारतात फक्त अकलेचीच तेवढी वानवा आहे. मग मी काय केले, तो प्रॉब्लेम सॉल्व्हच केला नाही. कारण प्रॉब्लेम सॉल्व्ह केल्यावर पुन्हा पुढे काय हा प्रॉब्लेम राहतोच ना ? मी प्रॉब्लेमवर नुसताच विचार सुरू केला.

इकडे प्रॉब्लेमवर मी विचार करीत होतो. तो तिकडून अडाणी अशिक्षीत जनतेच्या दर्जेदार वैचारीक मासीकाच्या संपादक मित्राचे निरोपावर निरोप येऊ लागले. काहीही लिहून पाठव. पांढऱ्यावर काळे कर. कथा लिही. आत्मकथा लिही. पण काहीतरी लिहून पाठव.

मग मी विचार केला. आत्मकथा लिहावी हेच चांगले. जेथे महात्म्यांचे सत्याचे प्रयोग' कोणी वाचीत नाही तिथे टीनपाट अनिल बर्व्याची आत्मकथा कोण वाचणार ? मग मी आत्मकथा लिहीली. पण पुन्हा पडला प्रॉब्लेम.

–आत्मकथेला नाव काय द्यावे ?

मग आठवले, 'दीन-ए-इलाही. जलालुद्दीन महंमद अकबराने आपल्या फर्जंदाकडून 'ऐने अकबरी' लिहून घेतली होती. 'ऐने अकबरी !' नाव कसं झोकदार आहे की नाही ? मग मीही माझ्या आत्मकथेला नाव दिले– 'ऐने बाबारी.'

'ऐने बाबारी' माझ्या संपादक दोस्ताला पाठवून दिली. महिना लोटला दोन महीने लोटले. अन् वडिलधारे म्हणू लागले अमुक्या-फलाण्या मासिकाचा तरुण संपादक वाया गेला. मग मीही मोठ्या बुचकळ्यात पडलो. माझा इतका 'सिंसीयर' संपादक मित्र वाया कसा गेला ?

तोच एक दिवस नजर शून्यात लावून – दाढीचे खूंट वाढवून – केस पिंजारून – माझा – 'अडाणी अशिक्षीत जनतेच्या दर्जेदार वैचारीक मासिकाचा संपादक मित्र मला भेटायला आला. आणि मला म्हणाला– "स्वतंत्र-सार्वभौम-लोकशाही प्रजासत्ताक भारतातील स्वातंत्र्योत्तर काळातल्या तरुण पिढीचे प्रातिनिधीक स्वरूप असलेल्या या 'ऐने बाबारीतील ध्वनीत अर्थ काय ?'

माझ्या पायाखालची जमीनच सरकली. मी विचार केला – 'या पोराला वेळीच योग्य सल्ला दिला नाही तर पोरगा स्वत:ची करीयर स्पॉइल करून घेणार' मग मी त्याला इराण्याच्या रेस्टॉरंटात नेले नी एक सिंगल चहा दोघात पीता पीता सांगितला–

"माझ्या संपादक मित्रा, 'ऐने बाबारातील' ध्वनीत अर्थ माझा मलाच ठाऊक नाही तिथे तो तुला कसा समजणार ? तेव्हा असे कर. तुझ्या मासिकाच्या येत्या अंकामध्ये 'ऐने बाबारी' छापून टाक नी त्याच्या चार प्रती चार विद्वानांना पाठवून दे. कारण–

"ऐने बाबारीतील ध्वनीत अर्थ – स्वतंत्र – सार्वभौम – लोकशाही – प्रजासत्ताक भारतातील चार विद्वानांशिवाय आणखी कोणाला समजणार ?"

□ □ □



## जबानी चौथी : शेवटची
## हप्ता दुसरा

लेखक : नारायण सान्याल
अनुवादक : अशोक शहाणे

आमची दोन टोळकी करायचं ठरलं. प्रत्येक टोळक्यात दीडशे सैनिक. पहिल्या टोळक्याचं नेतृत्व स्वत: प्रीतमसिंग करणार. साधुसिंग, मोहनसिंग न् लालसिंग वगैरे ह्या टोळक्यात असणार होते. ते सरळ दक्षिणेच्या बाजूनं हवाई अड्ड्यावर हल्ला चढवणार होते. अन् दुसऱ्या टोळक्याचं नेतृत्व होतं कॅप्टन गुरुबक्षसिंगकडे. मी त्याच टोळक्यात होतो. गुरुबक्षसिंगचा सहकारी म्हणून. आमचं टोळकं पालम-छुप्पनहून आणखी पश्चिमेला जाणार होतं. अन् वळसा घालून हवाई अड्ड्याच्या पश्चिमेकडनं हल्ला चढवणार होतं. म्हजे आमचं एक टोळकं दक्षिणेकडनं, एक टोळकं पश्चिमेकडनं न् जपानी लोकांनी ठरल्याप्रमाणं छामोलहून म्हंजे पूर्वेकडनं एकाचवेळी हल्ला चढवला की शत्रूच्या सैन्याची हबेलहंडी उडेल. हे तीन्ही हल्ले रात्री बारा वाजता सुरू झाले तर फारच बरं होईल. म्हणून कॅप्टन गुरुबक्षसिंगच्या नेतृत्वाखालचं आमचं टोळकं संध्याकाळीच बाहेर पडलं. प्रीतमसिंगच्या टोळक्यानं एक प्रहर रात्र उलटल्यावर निघायचं असं ठरलं. म्हंजे वळसा

चालू लेखमाला

# मी नेताजींना बघितलंय्

घालून आम्ही न् सरळ वाटेनं ते एकाच-वेळी आपापल्या जागी पोचतील. अशी सगळी योजना प्रीतमसिंगनं आम्हाला सांगितली.

ह्या योजनेप्रमाणं सगळ्यांनी आपापली कामं मुकाट्यानं पार पाडली असती, तर आमचं डिव्हिजनल हेडक्वार्टर्स आम्हाला दुसऱ्याच दिवशी पालेलला हलवता आलं असतं. पण दुर्दैवानं तसं काही झालं नाही. का झालं नाही ते मला आजपण कळलेलं नाही.

काय झालं ते मी सविस्तरच सांगतो ना.

प्रीतमसिंगचं टोळकं रात्री बरोब्बर साडेअकराला हवाई अड्ड्याजवळ पोचलं. त्यांनी पाह्यलं, हवाई अड्ड्याच्या चारी-बाजूंना काटेरी तारांचं उंच कुंपण. अन् खंदक खणून थोड्याथोड्या अंतरावर गुरखा पहारेकरी नेमलेले. म्हंजे ही बाजू त्यांनी चांगलीच सुरक्षित करून ठेवली होती.

तेव्हा मग प्रीतमसिंगनं ठरवलं, कॅप्टन साधुसिंगच्या नेतृत्वाखाली दहा-बारा जणांच्या टोळक्यानं पहाऱ्याच्या एका ठाण्यावर अचानक हल्ला चढवावा. म्हंजे आपोआपच बाकीचे पहारेकरी मदत करण्याकरता तिकडं धावून येतील. तेवढ्यात दुसऱ्या टोळक्यानं काटेरी तारांचं कुंपण तोडून काढायचं.

दुर्बीण लावून साधुसिंगनं पाह्यलं, ह्या गुरखा पहारेकऱ्यांच्याजवळ मशीन-गन्सपण आहेत. अन् आमच्याजवळ निव्वळ ऑटोमॅटिक गन न् रायफल !

पण तरी साधुसिंगच्या नेतृत्वाखाली हे दहा-बारा जणांचं टोळकं संगिनी रोखून पुढं जात राह्यलं. शत्रूची तयारी चांगली होती. पण ते काही इतकेसे सावध नव्हते. आम्ही खंदकाच्या खूप जवळ आल्यावर मग गुरखे एकदम ओरडले--तुम कौन हो ?

उत्तरादाखल आमच्या जवानांनी सगळ्यांनीच एकदम खंदकात उडी घेतली. ह्या अचानक हल्ल्यामुळं गुरखे अगदी गांगरून गेले. ४-१० गुरखा रायफल्सच्या बी कंपनीतले ते सैनिक होते. त्यांनी दोन्ही हात वर केले न् ते किंचाळून म्हणाले--साथी, हमको मत मारो !

आम्हाला सरसकट एक असं सांगितलं होतं की भारतीय सैनिकांनी आपल्यावर हल्ला चढवला नाही, तर पहिली गोळी कधीच आपल्याकडनं

सुटता कामा नये. त्यामुळं आमच्या सैनिकांनी काही त्यांना मारलं नाही. एवढ्यात लेफ्टनंट लालसिंग न् मोहन सिंगच्या बरोबर प्रीतमसिंगपण तिथं आले. गुरखे रक्तपाताविनाच शरण आल्यामुळं आमचं टोळकं कुंपणालगत आलं कुंपणाच्याबाहेर आमच्याच बाजूला एक पिलबॉक्ससारखं ठाणं होतं. तिथं दोन ब्रिटिश ऑफिसर्स होते. पंचवीस जणांचं एक टोळकं बनवून हे ठाणं ताब्यात घ्यायची कामगिरी प्रीतमसिंगनी त्यांच्यावर सोपविली. अन् ते स्वतः गेले कुंपण उपटून काढायला. कारण कुंपण हटवलं नाही तर त्यांच्या टोळक्याला हवाई अड्डयावर मुळी पोचताच आलं नसतं. खरंतर ह्या कामाकरता सर्वांत उपयोगी वस्तू म्हंजे सुरूंग. पण सुरूंग काही त्यांच्याजवळ नव्हता.

एवढ्यात ह्या पिलबॉक्समधनं एक भारतीय अधिकारी बाहेर आला. पंजाबी शीख. रँकनं कॅप्टन. आमच्याजवळ मशिनगन्स होत्या. परिस्थितीचं गांभीर्य तेवढ्यात त्याच्याही ध्यानात आलंच.

लेफ्टनंट मोहनसिंग समोरच होते. त्यांनाच त्यानं विचारलं—–तुम्हाला काय हवंय् काय ?

लेफ्टनंट मोहनसिंगनी ह्या अधिकाऱ्याला नीट न्याहाळलं अन् ते म्हणाले सत् श्री अकाल !

गांगरलेल्या पंजाबी ऑफिसरनं परत विचारलं—–पण हवंय् काय तुम्हाला ?

एवढ्यात लेफ्टनंट लालसिंग पुढं झाला. त्याच्या उजव्या हातात नागा बरची होती. तिनं जवळचंच एक ठाणं दाखवून तो म्हणाला—तिथं जे दोन ब्रिटिश बुलडॉग्ज लपून आहेत ना. त्यांचं रक्त हवंय् आम्हाला ! अन् मित्रत्वाचा जवाब हवाय् ! म्हणा-–सत् श्रीअकाल !

तो शीख ऑफिसर आपोआपच म्हणाला–– सत् श्री अकाल !

अन् त्याच क्षणी अंधारात एक रायफल गरजली ! ह्या पिलबॉक्सच्या लगतनं एक गोळी सूसाट आली अन् लालसिंगच्या डाव्या हातात घुसली. धक्क्यानं पडला लालसिंग पण तात्काळ परत उभा राहला. दुसऱ्याच क्षणी हातातल्या नागा बरचीसकट अंधारातच त्यानं धाव घेतली—क्षणभरापूर्वी आगीची ठिणगी लकाकली होती त्या रोखानं. गोळी चालवायजी दुसरी संधी काही मिळाली नाही त्या ब्रिटिश अधिकाऱ्याला. लालसिंगच्या बरचीनं तो ठार झाला.

पण तेवढ्यात दुसऱ्या ऑफिसरनं कंबरेच्या पट्ट्यातन रिवॉल्वर बाहेर काढलं होतं दोनेक हातावरनंच त्यानं दुसरी गोळी झाडली लालसिंगवर. पहिल्या अधिकाऱ्याच्या अंगातनं बरची बाहेरपण खेचता आली नाही लालसिंगला. पण मर्मी घाव लागलेल्या ह्या शूर वीरानं रिकाम्या हातीच उडी घेतली ह्या दुसऱ्या शत्रूवर. अन् त्यांचं नरडंच धरलं दोन्ही हातांनी !

इतक्या दिवसांच्या लढाईच्या माझ्या अनुभवानं मी पाहलंय् की माणूस अन्

वाघाच्या स्वभावात तसा फारसा फरक काहीच नसतो. रक्ताचा वास आला की वाघ बेचैन होतो. सर्कशीतला पाळलेला वाघदेखील ताज्या रक्ताची चव मिळाली की एकदम बावरून जातो. पिसाळतो. माणसाचंही नेमकं असंच आहे. रक्त सांडलं रे सांडलं की चेव येतो सगळ्यांनाच. अचानक !

सशस्त्र पहारेकऱ्यांनी एकदम गोळ्या झाडायला सुरवात केली आमच्यावर ! क्षणभरापूर्वीच ज्या दोघा शिखांनी धार्मिक अभिवादन केलं. होतं एकमेकांना सत् श्री अकाल म्हणून--ते जिवार उदार होऊन लढायला लागले एकमेकांशी.

मेजर प्रीतमसिंगच्या नेतृत्वाखालच्या आमच्या टोळक्याला तारांचं कुंपण काही उखडता आलं नाही. हातापायाला भोकं पडली त्यांच्या. अन् पूर्वेला तांबडं फुटलं ! हताश होऊन हल्ला मागं घेऊन प्रीतमसिंग उरलेल्या सैन्यानिशी खानजोलला परतले. त्यांच्या टोळक्यातले सत्तावीसजण जखमी झाले होते. शत्रूकडले दोन ब्रिटिश अधिकारी अन् आणखी अडतीसजण ठार झाले होते आमचापण एक अधिकारी मारला गेला होता—लेफ्टनंट लालसिंग !

पण लगेच त्याच रात्री आम्हाला ह्यातलं काहीच कळलं नाही. कॅप्टन गुरुबक्षसिंगच्या नेतृत्वाखाली बरोबर बारा वाजता आम्ही पश्चिमेकडनं हवाई अड्ड्यावर हल्ला चढवला होता. शत्रूला हल्ल्याची भीती फक्त दोनच बाजूंनी वाटत होती. पूर्वेकडनं न् दक्षिणेकडनं. त्यामुळं ह्या दोन्ही बाजूंना त्यांनी काटेरी तारा पसरल्या होत्या. पश्चिमेकडचा भाग हा त्यांच्या अखत्यारीतलाच. अन् आम्ही त्यांच्या भागात घुसून उलटीकडनंपण हल्ला चढवू असं त्यांना वाटलंच नव्हतं. त्यामुळं तिकडच्या बाजूला त्यांनी काटेरी तारा वगैरे टाकल्याच नव्हत्या. थोड्या अंतरावर खंदक खणून पहारेकरी बसवले होते. पिलबॉक्सेस नव्हत्या. एवढंच काय पण पहारेकऱ्यांना मशीनगन्सपण दिलेल्या नव्हत्या. नुसत्या रायफल्स. तेव्हा आमचा अचानक हल्ला काही त्यांना थोपवता आला नाही. लढाई न करताच पंचवीसेक रायफली आमच्या हाती आल्या.

मग आम्ही हवाई अड्ड्याकडे निघालो. इथं पहाऱ्याला सी-फोर्थ हायलँडर्सचं एक ब्रिगेड आहे हे आम्हाला ठाऊक होतं. आता त्यांची आमनेसामने गाठ पडेल अशी उमेद आम्ही बाळगून होतो. आमच्या दृष्टीनं ते एक दुर्मिळ भाग्य होतं. कारण समोर ब्रिटिश असले की मग आम्हाला काही विधिनिषेध नव्हता. पहिल्यांदा हल्ला चढवायला आम्हाला काही प्रत्यवाय नव्हता. कारण इथं शत्रू काही भारतीय नव्हता, ब्रिटिश होता. भारतीय सैन्याबरोबर लढाई करायची म्हंजे आम्हाला संकटच वाटायचं. मनच व्हायचं नाही. फार वाईट वाटायचं. कारण काही झालं तरी ते आमचे देशबांधवच होते की. आमच्या आझाद हिंद सेनेतले बरेचजण दोनतीन वर्षामागं ह्याच असल्या रेजिमेंट्समधे

नोकरी करत होते की. पण हायलँडर गोऱ्यांची गोष्टच वेगळी. आता त्यांची गाठ पडणार म्हणून आमचं रक्त सळसळत होतं.

पण नशीब आमचं! ह्या गोऱ्या लोकांशी त्या रात्री काही आमची गाठ पडलीच नाही. हवाई अड्ड्यापास्नं त्यांची छावणी मैलभर लांब होती. हवाई अड्ड्यावर पहारा देणारे भारतीयच होते. त्यांनी आम्हाला अडवायचा प्रयत्न केला.पण सरतेशेवटी शरण येण्यावाचून काही इलाजच नव्हता त्यांना.

हवाई अड्ड्याच्या धावपट्टीवर दोन बॉंबर्स न् एक फायटर विमान होत. रात्र उलटेपर्यंत आम्ही ती आमच्या ताब्यात ठेवली. पण पूर्वेकडनं काय न् दक्षिणेकडनं काय--आमची बाकीची मंडळी आलीच नाहीत फार वाईट वाटल त्या रात्री. मेजर गढवाल म्हणत होते ते खरंच होतं. मोटर वाहूल तशी चालवता येते, पण विमान चालवायचं काहीच माहित नाही ना! नाहीतर किमान एकतरी विमान उडवून घेऊन आलो असतो हेडक्वार्टर्सला !

पण पूर्वेकडनं जपानी टोळी काही आली नाही. रात्र संपेपर्यंत. पहाटेचा उजेडच तेवढा आला. मग नाइलाजानं तिन्ही विमानं पेटवून देऊन आम्ही खानजोलला परतलो.

आम्ही पालेलच्या हवाई अड्ड्यावरनं परतत होतो, तेव्हा कर्नल आय. जे. कियानींनी गांधी ब्रिगेडची आणखी एक तुकडी घेऊन थापू टेकडीवरचं शत्रूचं ठाणं उद्ध्वस्त करून टाकलं. तिथंही आमचे बरेच सैनिक कामी आले. शिवाय हेही ठाणं कर्नल कियानींना शेवटपर्यंत आपल्या कब्जात ठेवता आलं नाही. सकाळ झाल्याझाल्या शत्रूनं तोफा न् विमानांची मदत घेऊन प्रतिहल्ला चढवला. आम्ही आदल्या रात्री पालेलच्या हवाई अड्ड्याचा कब्जा असा सोडला नसता, तर तिथनं दुसऱ्या दिवशी इतक्या सहजासहजी अशी विमानं सुटलीच नसती.

सगळ्या तुकड्या सरतेशेवटी रेजिमेंटल हेडक्वार्टर्सला—म्हंजे खानजोलला—परतल्या. ह्या दोन दिवसांच्या लढाईत शत्रुपक्षाचं बरंचसं नुकसान झालं होतं. त्यांची बरीचशी शस्त्रास्त्रं आम्ही हिसकून घेऊन आलो होतो. आमचे अडीचशे लोक ह्या दोन दिवसांच्या लढाईत पडले. पण शत्रूचं नुकसान कितीतरी पटींनी जास्त झालं होतं. आम्ही त्यांना असा धडा देऊन आलो होतो, की आता महिनाभर तरी ते निव्वळ स्वत:चा बचाव करण्यातच गुंग राहतील. झालंही तसंच. त्यांनी एकही हल्ला चढवला नाही आमच्यावर.

खानजोलला परतल्यावर मेजर गढवालना भेटलो. त्यांना अजून उठून बसता येत नव्हतं. मला बघून म्हणाले—तू परतलास तर!

मी म्हणालो—हो सर. पण लालसिंग मात्र आला नाही!

सुस्कारा टाकून ते म्हणाले--हो, ऐकलं!

--पण लालसिंग तुमच्या प्रश्नाचं उत्तर देऊन मगच गेला सर! लाल-

तोंडचांच्या लाल रक्तानं 'होरी' खेळला लालसिंग !

मेजर गढवाल म्हणाले--ह्यावेळी तुमच्याबरोबर मी नव्हतो हे दुर्दैव आहे माझं.

ह्या रणांगणावर आमच्या ब्रिगेडचे मेडिकल ऑफिसर होते मेजर अलीअकबरखान. त्यांचं नाव भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या इतिहासात ठळकपणं लिहिलं जायला हवं खरं तर. बाँब न् तोफगोळचांच्या वर्षावात ते निर्भयपणानं पुढं जायचे. जखमी लोकांच्या जखमा स्वतःच्या हातानं बांधायचे. ऑपरेशन करायला लागणारी हत्यारं त्यांच्याजवळ अजिबातच नव्हती. मदतीला एखादी नर्सदेखील नव्हती. एक कात्री होती अन् एक सुरी होती. बास ! पण तेवढचाच बळावर अखंड मेहनतीनं मृत्यूची पर्वा न करता ते आपलं कर्तव्य बजावत असायचे. ह्या लढाईनंतर महिन्याभरानं मनिवा इस्पितळात मेजर अलीअकबरखान वारले. आत्ता मी ज्यावेळची गोष्ट सांगतोय्, त्यावेळी मेजर अलीअकबर म्हंजे आम्हाला साक्षात् देवासारखे होते.

अलीअकबर म्हणाले--मेजर गढवालसाहेब, तुमच्या पोटाचं एक ऑपरेशन करायला हवंय्. अन् ते काही इथं व्हायचं नाही. तेव्हा तुम्हाला मनिवाला पाठवून द्यायचं ठरवलय्.

मेजर गढवाल जोरजोरात मान हलवत म्हणाले--नाही डॉक्टर ! ऑपरेशन इथंच करा.

अलीअकबर चांगलेच थट्टेखोर होते. ते म्हणाले--मायनर ऑपरेशननं तर काही मेजरसाहेबांचं भागायचं नाही. इथं माझ्याकडे ॲनास्थेशियादेखील नाही. नाही, ऑपरेशन काही इथं व्हायचं नाही.

मेजर गढवालपण काही जिद्द सोडायला तयार होईनात. म्हणाले--मी काही झालं तरी माघारी जाणार नाही.

अलीअकबरखानना म्हंजे प्रत्येकच गोष्टीत थट्टा सुचायची. ते म्हणाले--ठीक आहे की. मागं जायचं नसेल, तर पुढं जा. पालेलला सुंदर इस्पितळ आहे. तिथले मेडिकल ऑफिसर घोष माझ्या चांगल्या ओळखीचे आहेत. एकाच वर्गात होतो आम्ही. इतका मोठा सर्जन तुम्हाला रंगूनलापण मिळेल का नाही, शंकाच आहे. तर जा तुम्ही. पालेललाच जाऊन ऑपरेशन उरकून या.

मेजर गढवालांचा चेहरा दुखण्यानं आधीच काळवंडलेला. आता त्याच्यावर वेदनेचंही सावट पसरलं. पण तिथनं परत कसा काय येऊ मी ?

खो-खो हसायला लागले मेजर अलीअकबरखान. म्हणाले--परत यायलाच हवं असं कुठाय् ? तुमची प्रतिज्ञा होती दिल्लीला जायची. तर तिकडंच जायला सांगतोय् मी. जा ना, दोन दिवस आधीच जा. दरम्यान मिसेस गढवालकरता एखाद्या भारतीय विद्यापीठात काही नोकरी मिळवून ठेवता येते का ते बघा. त्याही येतायत्च की मागोमाग !

मिसेस सरस्वतीबाई गढवाल म्हंजे प्रचंड पंडित. त्यांना बऱ्याच भाषा यायच्या असं ऐकलं होतं मी. मलायातल्या कुठल्यातरी कॉलेजात शिकवा-

यच्या लढाईच्या आधी.

गढवालसाहेब बघतच राहिले. त्यांच्या तोंडून काही शब्द बाहेर पडेना.

दुसऱ्या दिवशी कर्नल कियानींनी मला बोलवून घेतलं. ते म्हणाले—लेफ्टनंट सिंग, हे लोक म्हणत होते, तुम्हाला मोटार दुरुस्तीची काही माहीतगारी आहे म्हणून. खरंच का काय ?

आता मोटार-दुरुस्तीचं काम मला चांगलंच येत होतं. तेव्हा मी म्हणालो—हो सर ! थोडीफार माहीती आहे.

—इथं आपले दोन ट्रक्स आहेत. दोन्ही बंद होऊन पडलेयत. ड्रायव्हर म्हणतोय्, काही पार्ट्स बदलल्याशिवाय त्यातला एकपण चालू व्हायचा नाही. तेव्हा कायकाय पार्ट्स लागतील ते ड्रायव्हरबरोबर बसून जरा बघून घेता का ?


—बघतो ना सर ! हे दोन्ही ट्रक्स आत्ताच चालू व्हायला हवेत का सर ?

कर्नल हसून म्हणाले—हवे तर आहेतच. पण इथं तर काहींच सामग्री नाही. काही जखमी सैनिकांना छामोलच्या इस्पितळात पाठवायचंय्. मेजर गढवालनापण पाठवायला हवंय. पण दोन्ही ट्रक्स कुचकामी होऊन पडलेयत. कायकाय पार्ट्स् पाहिजेत ते बघा तुम्ही. मी लगेचच फटफटीवरनं कुणालातरी पाठवून देतो छामोलला.

लगेचच मी बाह्या सरसावून कामाला लागलो. अन् अर्ध्या तासानं कर्नलसाहेबांना म्हणालो—सर, दोन्ही ट्रक्स एकाच कंपनीचे आहेत. दोघांचेही काहीकाही भाग मोडलेयत. पण अदलाबदल करून एक ट्रक संध्याकाळपर्यंत चालू करता येईल. तेव्हा फटफटीवरनं कुणाला पाठवायची काही गरज नाही.



आंब्या आंब्यावर लिहीलेले असते चोखणाराचे नांव !




परंतू आंब्याच्या उत्तम लोणच्यावर लिहीलेले असते फक्त ठाकूरांचेच नांव !!

ठाकूर लोणची, पापड, मसाले, चटण्या.
माहीम मुंबई.

त्याच गाडीतनं जखमी सैनिकांना छोमोलला पाठवता येईल. अन् तीच गाडी परतताना दुसऱ्या गाडीकरता लागतील ते पार्टस् घेऊन येईल.

कर्नल खूष झाले. अन् तसंच करायचं ठरलं.

संध्याकाळच्या अंगाला 'सगळ्या जखमी लोकांना ट्रकमधे घातलं. गाडीबरोबर एस्कॉर्ट म्हणून कर्नलनी मलाच जायला सांगितलं. वाटेत ब्रिटिशांचे गनिमी छापे पडायची भीति होती. माझ्या हातात एक मशिनगन दिली. अन् तिघा लोकांना घेऊन संध्याकाळच्या पहिल्या प्रहरातच आम्ही निघालो.

खानजोनहून छामोल काही फार लांब नव्हतं. सहासात मैल असेल. पण रस्ता फार खराब होता. मधे 'आंग्रेशू'च्याजवळ एक पायवाटपण होती.

निघायच्यावेळी कर्नल कियानींनी माझ्याकडे एक मोहोरबंद लखोटा दिला. म्हणाले–येताना काही औषधं न् एक-दोन नर्सेस घेऊन यायला लागतील. मेजर अलीमकबरखानांचं म्हणणं आहे तरी. इथं एकही नर्स नाही. फार गैरसोय होते त्यांची.

सॅल्यूट करून मी निरोप घेतला. लगेच रात्रीच मी परत येणार होतो.

वाटेत काहीच अडचण आली नाही. रात्री दहाच्या सुमाराला आम्ही छामोळला पोचलो. मेजर गढवाल न् बाकीच्या लोकांना इस्पितळात पोचवून मी डिव्हिजनल हेडक्वॉर्टर्समधे प्रत्यक्ष मेजर-जनरलना भेटायला गेलो.

ते रात्रीचे जेवायला बसले होते. निरोप मिळाल्या मिळाल्या त्यांनी मला तिथच बोलवून घेतलं. डबल-फ्लाय तंबूत एक लाकडी टेबल न् पत्र्याची खुर्ची. आत पाहुणा कुणीच नाही. मेजर-जनरल एकटेच जेवत होते.

मी आत जाऊन लष्करी सॅल्यूट ठोकला. अन् लगेच म्हणालो––मी बाहेर थांबतो सर. तुमचं जेवण होऊ दे.

––तुझं जेवण झालंय् का ?

––नाही सर. काम उरकून मग जेवायला जाईन.

माझ्या बोलण्याकडे कानाडोळा करून सेनापतींनी वाढणाऱ्या शिपायाला सांगितलं––और एक खाना लगाव !

ताबडतोब एक खुर्ची न् एनॅमेलची थाळी आली. डिव्हिजनल कमांडर मेजर जनरल पण ह्या एनॅमेलच्या थाळीतच जेवत होते. चपाती, आलूमटर न् डाळ. एवढंच. आणखी काहीच नाही. साध्या शिपायांना पण हेच मिळतं.

खाता–खाता त्यांनी आमच्या पालेलच्या चढाईची कहाणी ऐकली. पूर्वेकडनं ठरल्याप्रमाणं जपानी लोकांनी का हल्ला चढवला नाही ते विचारावंसं मला वाटत होतं. पण इतकं कुतूहल दाखवणं योग्य होणार नाही असं वाटलं. अन् मी काहीच विचारलं नाही.

जेवण झाल्यावर त्यांनी लखोटा फोडला. पत्र वाचलं. ऑर्डर्लीला बोलवून ते म्हणाले––मिसेस थीबर्स को सलाम दो। और डॉक्टर बोस को।

ऑर्डर्ली सॅल्यूट करून गेल्यावर मेजरजनरल मला म्हणाले––मला

मोटार-दुरुस्तीच काम चांगलंच येतंयसं दिसतय्

मी म्हणालो--थोडंफार येतं सर ! सैन्यात भरती व्हायच्याआधी सिंगा-पूरला मी एका मोटार रिपेअरिंग वर्क-शॉपचा मालक होतो सर.

--डियर मी ! म्हंजे तो हार विकत घेणारा तो तूच का काय ?

मी लाजून हसलो.

--तरीच ! मघापासनं वाटत होतं तुला कुठंतरी पाह्यलंय् असं ! पण म्हंजे मग वेगळीच व्यवस्था करायला हवी !

मेजर-जनरल कियानी मधेच थांबले. काहीतरी विचार केला त्यांनी. मग म्हणाले--कर्नल अशीदना ओळखतोस का तू ?

--नाही सर !

--कर्नल अशीद आपल्या मोटर ट्रान्सपोर्ट कपर्नाचे इनचार्ज आहेत. इथं छामोललाच आपल्या बावीस गाड्या आहेत. त्यातल्या सात जखमी होऊन पडल्यायत. इथं चांगला मिस्त्री नाही कुणी. तेव्हा तू काही आत्ताच खान-जोलला जाऊ नकोस. ह्या गाड्या आधी चालू कराव्या लागतील.

हाय गुरू नानकजी ! शेवटी हेच आहे का माझ्या कपाळी ! वडलांचा मोटारगाड्यांचा धंदा होता. सगळं सोडून पळून गेलो ब्रह्मदेश-मलायात. तिथंही परत ह्याच फंदात अडकलो-- मोटारगाड्यांची दुरुस्ती ! नंतर सगळं फुंकून टाकून सैन्यात भरती झालो. पण इथंही परत तेच ! म्हंजे घाणी कुठंही हलवा पण तेल गाळण्याखेरीज दुसरं कामच नाही तिला !

मी नम्रपणानं म्हणालो-- तुम्ही जो काही हुकूम कराल तो मला पाळा-वाच लागेल. पण मी जरा...म्हंजे... जरा धाडसाचं काम मिळालं असतं तर बरं झालं असतं.

--धाडसाचं काम ?

जरा विचार करून मेजर-जनरल परत म्हणाले-- अच्छा तर, तशाच एका कामाची जिम्मेदारी तुझ्यावर सोपवितो. फार धाडसी न् अत्यंत गुप्त काम आहे मात्र !

ह्याचवेळेला ऑर्डली परत आत आला. डॉक्टर बोस न् मिसेस थीबर्स आल्याची वर्दी त्यानं दिली. मेजर-जनरलनी त्यांना आत पाठवून द्यायला सांगितलं.

मेजर-जनरल कियानी म्हंजे बोला-यला अगदी मोजूनमापून. डॉक्टर कॅप्टन बोसांच्या हातात त्यांनी एक यादी दिली. म्हणाले--ही औषधं न् हत्यारं रात्री बाराच्या आत पॅक करून इथं पाठवून द्या. लगेच खानजोलला धाडा-यचीयत ती. हे डिलिव्हरी घेतील.

डॉक्टर बोस काही बोलणार इतक्यात त्यांना थांबवून मेजर जनरल म्हणाले-- ते मला ठाऊक आहे. जी औषधं अजि-बातच नाहीत, ती तुम्ही तरी कशी काय देणार ! पण जी आहेत ती तर द्या.

कॅप्टन बोस सॅल्यूट करून निघून गेले.

--लेफ्टनंट थीबर्स, दोन नर्सेस

ह्यांच्याबरोबर आज रात्रीच खान-जोलला पाठवायला हव्यात. अली-अकबरची तातडीची मागणी आहे तुमच्याजवळ किती राण्या आहेत ?

—सातजणी आहेत सर! पण प्रत्येकीला बारा-बारा तास हॉस्पिटल ड्यूटी द्यावी लागतीय् !

—तरी निदान एकीला तरी पाठ-वायलाच हवं. पण कुण्या एकट्या मुलीनं तिकडे जाणंपण काही ठीक होणार नाही, नाही का ?

—कुणाबरोबर पाठवायचीय् मुलगी ? लेफ्टनंट हरगोविंदसिंगच्या-बरोबरच ना ?

—! तुम्ही ह्यांना ओळखता वाटतं ?

—ह्यांना कोण ओळखत नाही ! यांनी आपलं सर्वस्व देऊन टाकलं नेताजी फंडात. तर ह्यांच्याबरोबर पाठवता येईल अशी एक राणी आहे.

मेजर-जनरल कियानी जरा घुटमळत म्हणाले—पण अशा रात्री एकट्या एका मुलीला—म्हंजे मला म्हणायचंय्, खान-जोलला आणखी मुलगी कुणीच नाही. तेव्हा तिला फार एकट-एकट वाटेल ना ?

मिसेस थीवर्स म्हणाल्या—नाही सर ! ज्या मुलीला मी पाठवतेय् ती लेफ्टनंट हरगोविंदसिंगची वाग्दत्त वधूच आहे !

मिसेस थीवर्सनी माझी दाढी धरून हिसका मारला असता तरी मी इतका चाट पडलो नसतो !

—मग काही प्रश्नच नाही !

मेजर-जनरल म्हणाले.

मी तऽतऽपऽप करत म्हणालो—पण सर, मला तर तशी काहीच खबर नाही ! म्हंजे अशी कुणी स्त्री—मला तर आठवत नाही !

माझ्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून मेजर-जनरल कियानी मिसेस थीवर्संना म्हणाले—कोण मुलगी माझ्या ओळ-खीची आहे का ?

—हो ! आहे की ! लान्सनायक सुभद्रा जयस्वाल ! अर्थात आपली अन् तिची काही ओळख नाही किंवा ती काही आपली वाग्दत्त वधू नाही असं हरगोविंदसिंगजींचं म्हणणं असेल, तर मग काहीतरी वेगळी व्यवस्था करायला लागेल !


मेजर-जनरल कियानींनी एक कटाक्ष माझ्याकडे टाकला अन् ते किंचित् हसले. मग म्हणाले—पण ह्याच्या डोक्यात तर अशी कुणी स्त्री नाहीच !

मी परत तऽतऽपऽप करत म्हणालो नाही सर ! सुभद्रादेवींना मी ओळखत नाही असं मी कसं म्हणेन ! पण—

—पण ती तुझी वाग्दत्त वधू आहे हे काही तुला कबूल नाही, हो का नाही ? तर मग मिसेस थीवर्स—

मी मधेच म्हणालो—माफ करा सर, पण मला तसंही काही म्हणायचं नाही ! म्हंजे...म्हंजे...माझी काहीच हरकत नाही सर !

—थँक्यू ! तर मग तसाच बंदोबस्त करा लेफ्टनंट थीवर्स ! सुभद्रेला रात्री बाराच्या आंत इथं येऊ दे. बॅग-बॅगेज घेऊन ! अन् तिची मूवमेंट ऑर्डर


अंड्यांचा भाव डझनांत सांगितला जातो...
खरंच आहे हें. तुम्ही अंडी घेतां
तीं प्रत्येक नग नीट पारखून म्हणजेच
एखाद्या विशिष्ट संख्येंत.
वजन-मापांचा वापर
करून नव्हे. पण तुमच्या रोजच्या
गरजा फक्त अंड्यांवरच
पुर्‍या होत नाहीत. तुम्ही
रोज जें, दूध घेतां तें लीटरमध्ये,
आवडत्या भाज्या, फळं,
धान्य, मांस किंवा इतर घन
पदार्थ किलो (ग्राम) मध्ये,
शोभिवंत कापड
मीटरमध्ये....
दशमान वजन-मापांमुळे तुमची
नेहमीची खरेदी विक्री सुकर आणि
सुखकर होते. आता डोकं
खाजवण्याची किंवा किचकट हिशेबांत
बुडून जाण्याची गरज उरलेली नाही.
वस्तु घेण्यासाठी दिलेल्या पैशाची
पुरेपूर वसूली होण्याची हमी, अगदी
भाववाढीच्या या काळांतहि जर
कशामुळे मिळत असेल, तर, ती दशमान
पद्धतीच्या वजन-मापामुळे. दशमान
पद्धतीची वजन-मापं वापरल्यामुळें
विश्वासाची भावनाहि
निर्माण होते.
विक्री-खरेदीसाठी दशमान परिमाणं
(मेट्रिक युनिट्स्) वापरा.
davp 72/515

त्याच्या आंत तयार व्हायला हवी.

सॅल्यूट करून थीबर्स निघून गेल्या. जायच्या आधी त्यांनी माझ्याकडे एक गोड कटाक्ष टाकला.

तंबूत आम्ही दोघंच राह्यलो. मग सेनापती म्हणाले—आता कामाचं सांगतो. इथनं खानजोलला जायच्या वाटेवर तीन मैलावर पायवाटेनं जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्या अंगाला—म्हंजे पूर्वेला—एक टेकडी आहे. बघितल्याय्स का ती? तिचं नाव आहे आंग्रेशू.

—हो, बघितल्याय् सर. टेकडीच्या माथ्यावर एक मोडकं घरपण दिसतं.

—एक्झॅक्टली! पण माथ्यावरचं ते काही मोडकं घर नाही. ते आहे फुंगीचंग. म्हणजे पॅगोडा. ब्रह्मी लोकांचा एक प्रसिद्ध पॅगोडा आहे तो. बॉबिंगमधे त्याचं डोकं उडालंय् इतकंच.

—तो मला माहित आहे सर.

—बरोब्बर तीन मैलावर रस्त्याच्या कडेला डाव्या हाताला एक प्रचंड पिंकाडो झाड आहे. पिंकाडो झाड माहीत आहे का नाही? 'लोहाकाठ' म्हणतात त्याला. ह्या झाडाखाली तू ट्रक उभा कर. रात्री बरोब्बर साडेबाराला ट्रक ड्रायव्हरला गाडीतच बसून राहू दे. तू पायी ह्या टेकडीवर जायचंस. त्या पिंकाडो झाडाखालनं एक पायवाट जाते. छोटीशी पायवाट—लाकूडतोड्यांची जायची-यायची वाट आहे ती. इथनं जाताना एक कुऱ्हाड बरोबर घे. टेकडी काही तशी फार उंच नाही. पाचेकशे फूट असेल. एक वाजायच्या आत तू वर पोचायला हवंस. तिथं कुणीच नसतं. ह्या पॅगोडाच्या समोर रस्त्यावर झुकलेला एक प्रचंड पार्चिंग स्टोन आहे. तो दिसेलच तुला. आता तुझं काम असं की, ह्या टेकडीच्या माथ्यावर जाऊन तू एक झाड तोडायचंस. मग ह्या पार्चिंग स्टोनवर एक भली थोरली चिता रचायची. चिता किमानपक्षी आठ बाय आठ फुटांची तरी हवी. म्हंजे बेसला. अन् उंची सहाएक फूट. चिता रचून झाली की तू परतायचंस ट्रककडे. तीन वाजायच्या आत. म्हंजे मग पहाट व्हायच्या आधी तुम्हाला खानजोलला पोचता येईल. एनी क्वेश्चन?

—चिता पेटवायची नाही?

—सत्यानास! नाही नाही, पेटवायची नाही! निव्वळ रचून ठेवायची न् निघून यायचं. आणखी काही विचारायचंय्?

—नाही सर!

—ठीक आहे! अन् आणखी एक गोष्ट! असं असं आपण केलं म्हणून तू तोंडी कर्नल कियानींना सांग. अन् नंतर हे सगळं चक्क विसरून जा. फारच थोड्या लोकांना हे माहीत असणाराय्. अन् एक लक्षात ठेव, हे अत्यंत गुप्त काम आहे.

ह्या अजब हुकमाचा अर्थ काय, मला काहीसुद्धा कळलं नाही. पण फौजी आयुष्य हे असंच.

मी सॅल्यूट ठोकून निरोप घेतला.

रात्री बरोब्बर बारा वाजता आम्ही निघालो. त्याच्या आधी मोटारीचे

पार्ट्स, औषधं न् नर्सला माझ्या हवाली केलं होतं. पहिल्या दोन निर्जीव पदार्थांच्याकरता पावती लिहून दिली. शेवटच्या पदार्थाकरता काही पावती द्यावी लागली नाही. लेफ्टनंट थीबर्सनी गंभीरपणानं ओळख करून दिली--हे लेफ्टनंट हरगोविंदसिंग. हे तुला एस्कॉर्ट करतील. अन् ही लान्सनायक सुभद्रा जयस्वाल. तुमच्या युनिटची नवी नर्स.

लान्सनायक जयस्वालनं खाड्दिशी सॅल्यूट ठोकला न् म्हणाली—जयहिंद !

मी इतका भारावून गेलो होतो की परत सलाम करायला मला उशीरच झाला जरासा.

——तुमचा प्रवास गोड होवो !

लेफ्टनंट थीबर्स म्हणाल्या. जणूकाही मी बायकोला घेऊन संसार थाटायलाच निघालो होतो !

पण मला काही ह्याच्यावर काय बोलावं ते सुचलं नाही.

अंधारातनं ट्रक धावत सुटला. ड्रायव्हर स्टिअरिंगवर बसलेला, शेजारी सुभद्रादेवी अन् खिडकीशी मी. रस्ता भलताच खराब. ट्रक चक्क नाचत-नाचतच चालला होता. दरम्यान सुभद्रा माझ्याशी एकही शब्द बोलली नव्हती. जणू माझी न् तिची काही ओळखच नव्हती. कुणी अनोळखी मुलगी असती तर नक्कीच मी बोलायला सुरवात केली असती. पण ही इतकी ओळखीची की आपण नेमकी कशी काय सुरवात करणार ! अन् ती तरी असं तोंड फुगवून काय म्हणून गप्प बसून राह्यल्याय् ! ती काय रागावली का काय आपल्यावर ? म्हंजे 'मी काही तिला ओळखत नाही' असं जे आगण म्हणालो म्हणून मिसेस थीबर्सनी सांगितलेलं दिसतंय् तिला ! पण आपण असं कुठं म्हणालो होतो !

अर्धातास गेल्यावर माझ्या लक्षात आलं की मधे बसल्यामुळं बिचारीला धरायला काहीच मिळत नाहीय्. गाडीच्या धक्क्यांच्यामुळं एकसारखी ड्रायव्हरच्या अंगावर आदळतेय् ती. ड्रायव्हरला गाडी थांबवायला सांगितली मी. सुभद्रेला म्हणालो — त्यापेक्षा तू खिडकीशी बस, मी मधे बसतो.

तिनं भिवया उंचावल्या हे मला अंधारातपण दिसलं म्हणाली—का ?

--तुला...म्हंजे . तुला त्रास होत असेल !

—नाही ! धन्यवाद ! तुम्ही काही त्रास करून घ्यायला नको ! ड्रायव्हर, चलाव !

हाय गुरुजी ! हीच का ती सुभद्रा ! जी मुलगी रंगूनच्या फलाटावर सरदार हरगोविंदसिंगाला म्हणाली होती — 'आप' नही जी ! कहो तुम् ! अब तो मैं तुम्हारी कॉम्रेड बन गयी हूँ !

पण ड्रायव्हर असताना हे कसं काय उकरून काढणार ! मिसेस थीबर्सनीच हा गुंता करून ठेवलाय्, हे माझ्या चांगलं लक्षात आलं ! 'तुमचा प्रवास गोड होवो' असं तोंडानं म्हणाल्या, पण इकडे विष ओतून ठेवलंय् सुभद्रेच्या कानात !

जरा वेळानं आम्ही त्या पिकाडो झाडाशी येऊन पोचलो. परत ट्रक थांब-

वला मी अन् तेव्हा कुठं माझ्या ध्यानात आलं की सेनापतींनी 'एनी क्वेश्चन' म्हणून विचारल्यावर आपण सगळ्यांत आधी जे विचारायला पाहिजे होतं, ते विचारायचं विसरून गेलो की ! ही सजीव ठेव आता कुठं ठेवायची ? ह्या ड्रायव्हर जवळ ? निर्जन अरण्यांत ? एक वाजल्यापास्नं तीन वाजेपर्यंत ?

——काय झालं ? गाडी का परत उभी केलीत ?

—— मला काम आहे एक. महत्त्वाचं. जंगलाच्या आत जावं लागेल. दोनेक तास लागतील परतायला.

——असं काय महत्त्वाचं काम आहे ? सुभद्रेनं विचारलं. परत तिच्या भिवया वर गेल्या.

मी काहींच उत्तर दिलं नाही

—मग इथं दोन तास आम्ही दोघं काय गाणी म्हणत बसू वाटतं ? ते काही चालायचं नाही. तुम्ही आधी मला खानजोलला पोचतं करा. मग वाटलं तर तुम्ही परत या तुमचं महत्त्वाचं काम उरकायला !

पण हे मला कसं कबूल होणार ? तीन वाजायच्या आत टेकडीच्या माथ्यावर चिता रचून ठेवायचा हुकूम आहे मला. कशाकरता वगैरे मला काहीच माहीत नाही. पण प्रत्यक्ष सेनापतींचा हुकूम ! पाळायला तर हवाच !

——काय झालं ? चला, बसा गाडीत !

जवळजवळ हुकमाच्या सुरात सुभद्रा म्हणाली.

मी म्हणालो—नाही ! तूच खाली उतर उलट !

एकदम हटून बसली सुभद्रा. कर्कश स्वरात म्हणाली——लेफ्टनंट सिंग, तुम्ही मला एकेरी संबोधू नका !

——ठीक आहे. तसं म्हणतो. सुभद्रादेवी, तुम्ही खाली उतरा !

—का ?

मी खंबीर आवाजातच म्हणालो—— सुभद्रादेवी, लष्करी नियमात 'का'ला काही स्थान नाही ! तुम्हाला माझ्या हवाली केलेलं आहे ! मी तुम्हाला हुकूम करतोय्——लान्सनायक सुभद्रा जयस्वाल, तुम्ही खाली उतरा आणि माझ्या मागोमाग या !

सुभद्रा अगदी गोरीपान होती. आता रागानं तिचा चेहरा गुलाल माखल्यासारखा लालभडक झाला होता. जणू मी चुकून तिच्या काळजावरच पाय दिला होता ! ओठ थरथरायला लागले तिचे ! तिच्या तोंडून अस्पष्ट शब्द बाहेर पडले—हे काय म्हणतोय्स तू ?

——मला उशीर होतोय् !

ड्रायव्हरनं तोंड फिरवलं. तो गालातल्यागालात हसतोयसं वाटलं !

सुभद्रा गाडीतनं खाली उतरली. रायफलीत तिनं काडतूस भरून घेतलं. मग रायफल हातात घेऊन ती म्हणाली——ठीक आहे, चला ! कुठं जायचं असेल तिथं चला !

[ क्रमशः ]

# आस्तिक – नास्तिक : देवीदास बागूल

पुस्तके

अनिरुद्ध कुलकर्णी

आस्तिक-नास्तिक या नावावरून उगाचच होणारा गैरसमज दूर करूनच वाचकांनी बागूलांच्या या नव्या लघुनिबंधांचे वाचन आणि स्वागत करावयास हवे. आस्तिक-नास्तिक या शीर्षकावरून असे वाटण्याचा संभव आहे की ही पुस्तिका एखादा अभ्यासपूर्ण आणि शिस्तबद्ध प्रबंध असावा पण बागूलांच्या इतर लिखाणाची ज्यांना अगोदरच कल्पना आहे त्यांना 'काय भुललासी वरलिया रंगा' हा बागूलांच्या विलक्षण आवडीचा चरण काही मुद्दाम्न आठवून देण्याची गरज नाही. 'कलेचे विकेंद्रीकरणा'प्रमाणेच प्रस्तुत पुस्तक देखील पोटतिडकीने विणलेल्या छानश्या लघुनिबंधांचा संग्रह आहे.

मात्र या दहाही ललित निबंधांना एकत्रित गुंफून घालणारा एक 'समज' आहे. भागवत धर्माच्या प्रणेत्यांनी जे धार्मिक विचार मांडण्याचा आणि प्रसृत करण्याचा आटोकाट प्रयत्न केला तो सारा प्रयत्न त्यांच्या मठ्ठ वारकरी अनुयायांना समजलाच नाही आणि त्यामुळे त्यांनी मूळ शिकवणुकीला अगदी विपरीत वळण दिले व परिणामत: स्वत:चे आणि महाराष्ट्रीयनांचे नुकसान केले हा तो ठळक 'समज.' 'जेथे आदिवासी हलाखीत आहेत, दुष्काळ आहे, भूकंपाचा अनर्थ आहे तेथे 'भूतांच्या पालनासाठी तुकारामाची पालखी जावयास हवी होती. पण प्रत्यक्षात मात्र तुकारामाची पालखी फक्त पंढरपूरला जाते आणि घुमजाव करून नाकासमोरच्या रेषेत परत देहूला येते' किंवा 'पण त्याचे भक्त असे विकृत निघाले की खुद्द तुकाराम जरी भांगऱ्या डोंगरावर गेला असला तरी त्याची पालखी मात्र त्यांनी गर्दीनी गजबजलेल्या शहरातच नेली. तिथे कापडाच्या कमानी मंडप उभारले आणि आकाशाशी असलेले नाते तोडून टाकले' किंवा 'वारकरी तुकारामाकडे आले कशासाठी

आणि मिळाले काय.' आले होते पार-लौकिकाच्या गोष्टीसाठी पण ऐकाव्या लागल्या ऐहिकाच्या गोष्टी, आले होते पंढरपूरच्या दिशेसाठी; हुकूम मिळाला गावातच फेरा घालण्याचा; वाटले होते कृपेचा वर्षाव होईल, पण घ्यावा लागला सेवेचा वसा. म्हणजे भरवशाच्या म्हशीला टोणगाच झाला म्हणा की!' किंवा 'सावता माळचाने 'कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी' असे सांगितल्याने दैनंदिन कामाचे स्वरूपच बदलायला फार मोठी मदत झाली.' अशा कमावलेल्या सहज भाषेतून बागूल त्यांचा हा समज फुलवत फुलवत नेतात आणि स्वतःची देवविषयक कल्पना प्रथम भावकाव्याच्या पातळीवर नेऊन नंतर समूळ नाहीशी करून टाकतात. याला वारकरी पंथाचे संतवाङ्मय हात-भार लावते याबद्दल ते कृतज्ञता सुरु-वातीसच व्यक्त करतात. संतांनी विठ्ठल विठ्ठल करीत करीत विठ्ठलालाच उधळून देण्याचे कुशल कर्म केले आणि तुरळक उद्गारांतून का होईना पण माणसाला स्वतःच्या पायावर उभे केले; हा त्यांच्या विचारतरंगांचा केंद्रबिंदू आहे. संतांचे हे कार्य जणू हिंदी-चीनी भाई भाई अशा आरोळ्या ठोकणाऱ्या पण काहीच दिवसात हिंदी सरहद्दीवर आक्रमण करणाऱ्या चाऊ-माऊंच्या कार्यासारखेच आहे आणि मठ्ठ मराठी माणसे इतके वर्ष निष्कारणच गंडविली गेली हे बागूलांशी सहमत होऊ पाहा-णाऱ्या वाचकाला वाटल्यावाचून राहा-णार नाही.

संतवाङ्मयाचे मूल्यमापन नव्या हिरीरीने होत असते. आस्तिक-नास्तिक या प्रमुख सूत्राला बगल देऊन सारे निबंध संतवाङ्मयातील काही निवडक वेचे घेऊन त्यांचा वेगळाच अन्वय लावण्यात बागूलांनी या हिरीरीचा पुनः प्रत्यय मराठी वाचकांना आणून दिला आहे. त्यांच्या वैचारिक पवित्र्या-बद्दल मतभेद होणे स्वाभाविकच आहे. परंतु असे गोड मतभेद निर्माण करून वाचकाला गुदगुल्या करायच्या हाच तर मुळी लघुनिबंधांचा हेतू असतो. काहीतरी विपरीत आव आणून हलक्या-फुलक्या भाषेत काहीतरी मर्म उकलून दाखवायचे हा तर अशा ललित स्फुटांचा हेतू असतो. आणि हा हेतू बागूलांनी पूर्णपणे साध्य केला आहे. 'देव म्हणजे काय याचा मतैक्याने निर्णय झाला नसल्याने देवामुळे मानव जातीचे नुकसान इतके होत आहे की त्या नुकसानीपुढे अॅटमबाँबने हिरोशिमाचे केलेले नुकसान कमी ठरेल' असे स्टिरीओटाईप उद्गार काढणारे बागूलच जेव्हा लिहितात की, 'मात्र न भेटताही त्या देवाने काही प्रसन्नकारक गोष्टींची जी गाठ घालून दिली ती आजही स्मरावीशी वाटते आणि त्या स्मरणाने मन उत्फुल्ल होते... माघ महिन्यात भल्या पहाटे नदीवर स्नानासाठी नेले ते देवानेच. आईबरोबर पहाटेच्या अंधारात नदीवर जायचे, नदीच्या वाहात्या थंडगार पाण्यात अंघोळ करायची, वाळूत शंकराची पिंड करून त्याची पूजा-आरती करायची, आणि

शेवटी नदीत दिवे सोडायचे. नदीच्या प्रवाहातून तरंगत जाणारे दिवे पाहून काय वाटायचे कोणास ठाऊक? पण त्या निमित्ताने झालेली नदीची आणि पहाटेची विविध दर्शने यांनी माझ्या ठायी देवापेक्षा निसर्गाचेच प्रेम जागृत केले.' तेव्हा वाचकाला या निबंधातील उत्कटता तर जाणवतेच पण लेखकाच्या बौद्धिक नुकसानातील भावनिक प्रामाणिकपणाही जाणवतो.

'खरे म्हणजे' (लेखकाची आवडती सुरुवात) बागूलांचे निबंध वारकरी पंथाच्या अध्वर्युंच्या विचारांबद्दलही आहेत असे मानू नये. कारण ज्यासाठी बागूल वारकरी पंथाच्या या संतांबद्दल कृतज्ञता भाव बाळगतात त्या गोष्टी त्यांना इतरत्र याहीपेक्षा कमी कष्टात मिळाल्या असत्या. त्यांना जे हवे हवेसे वाटते ते सांगण्यासाठी "संतांनी माणसाच्या जीवनाला माणसाचेच परिमाण देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सज्जनात देव पाह्यला सांगितले, देवाची कावड तृषार्त गाढवाला पाजली, कांदामुळा भाजीची मशागत करण्यात देवपुजेचे सुख अनुभवले, प्रत्येक मडके घ्यायला देव येणार आहे असे समजून माणसांसाठी प्रत्येक मडके चांगले तयार केले, माणसाच्या डोंग्या शरीराला महत्त्व देण्याऐवजी भावनेला महत्त्व देण्यातले सौंदर्य दाखवले; थोडक्यात म्हणजे त्यांनी देवदेव म्हणत माणसाच्या जीवनाला दैनंदिन सौंदर्य आणि स्वावलंबन दिले.' असा कालोचित निष्कर्ष काढण्याचे काही कारण नव्हते. पण लघुनिबंधाची हीच तर मौज असते हे वाचकांनी पुन्हा आठवले पाहिजे. भूतकाळातील लिखाणाचा कालोचित आणि स्वत:ला रुचेल व पचेल असा अर्थ प्रत्येक पिढी लावीत असते. ह्यात वैचारिक अप्रामाणिकपणाचा भाग नसतो. बागूलांनी हेच केले आहे आणि त्याबद्दल त्यांच्या पिढीतील त्यांचे स्नेही त्यांचे स्वागतच करतील. धार्मिक लिखाणाबाबत असे प्रयत्न करणे समाजवादाच्या दृष्टीने श्रेयस्कर मात्र आहे असे बागूल निक्षून सांगतात.

या लघुनिबंधांच्या वाचनाने वाचकाला पुन्हा भारतीय मन म्हणजे काय याचा पुन्हा प्रत्यय येतो. हा प्रत्यय दुर्गाबाई भागवत, साने गुरुजी, गो. नी. दांडेकर यांचे लिखाण वाचताना येतो. या मनाला हळवेपणा वेढून टाकतो. पानापानातून हा हळवेपणा ओसांडतो. बागूलांच्या साऱ्याच निबंधात या हळवेपणाची उत्कट 'मांडणी' झाली आहे. 'उठा, जागे व्हा, वृक्षवल्लींना सोयरे करून निसर्गातील अक्षय आनंद लुटा उठा जागे व्हा, रंकांना विसरू नका' अशा किंवा 'अरेरे!... ज्ञानेश्वरांनी सांगितले काय, नि त्याचे वारकरी शिष्य करतात काय?...' अशासारख्या उद्‌गारातून हा हळवेपणा प्रचीतीस येतो. हळवेपणामुळे अत्यंत मूलभूत अशा प्रश्नांना हात घालता आला नाही तर वाईट वाटण्याचे कारण नाही. मूलभूत प्रश्नांना हात घालण्याचे काम लघुनिबंधांचे नसते. त्यात महत्त्वाची असते ती शैली. हिंदूचे प्रमुख

देव राम-कृष्ण-शिव विचारात घेतले तर दिसून येते की हे सारे देव युद्ध करीत आणि त्यांच्या दृष्टीने दुष्ट असणारांना ठार मारीत. हे एखादेवेळेस घडत असे, असे नाही तर हे वारंवार घडत असे. साऱ्या भारतभर देवळे बांधली गेली आहेत ती या देवांची. हे देव देखील आधी माणसाचीच गरज भागवत होते. मग या लढणाऱ्या दैवी माणसांचा आणि ज्ञानबा-तुकारामाच्या शिकवणुकीचा संबंध काय ? ह. भ. पं. नी ज्ञानबा-तुकारामाच्या शिकवणुकीला हरताळ फासला त्यापेक्षा मोठ्या प्रमाणावर ज्ञानबा-तुकारामानीच हिंदुच्या धर्मस्वरूपाला फासला काय ? अशासारखे मूलगामी प्रश्न उपस्थित करण्याचे काम या निबंधांचे नसते. 'हसत खेळत इंग्रजी' तसे 'हसत खेळत वारकरी शिकवण' हे या निबंधाचे काम आणि बागूल अशा कामात पटाईत आहे हे त्यांचा वाचकवर्ग ओळखून आहे.

सावता माळ्यावर लिहिलेला 'कांदा-मुळा-भाजी' सारखा सुंदर लघुनिबंध बागूलांच्या चिंतनाचे मनोरम स्वरूप दृष्टोत्पत्तीस आणतो. 'खरे म्हणजे' (पुन्हा बागुलांची आवडती सुरूवात) हा लघुनिबंध शालेय क्रमिक पुस्तकात समाविष्ट व्हायला हवा. त्यातील प्रसन्नता इतकी निरोगी आहे की तिचा संस्कार व्हावा. 'काम शेतात करायचं आणि मन पंढरपूरला रेंगाळत ठेवायचं अशी फारकत जीवनात आल्यावर कोणत्या घरात शांती नांदेल ? असा मार्मिक


# राजा शिवछत्रपती

**ब. मो. पुरंदरे**

**किंमत : तीस रुपये**

प्रकाशक

**महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान**

सातारा

एकमेव विक्रेते

**राजहंस प्रकाशन**

पुणे

प्रश्न बागूल स्वतःला करतात आणि रोजचं दैनंदिन काम करण्यातच विठ्ठल सामावला आहे असे समजावतात. यत्न तो देव जाणावा या समर्थांच्या उक्ती पाशी येऊन ठेपतात. मानवी जीवनावर प्रेम करण्यातच ईश्वर सामावला आहे, मानवी जीवन समरस होऊन जगणे आणि ईश्वरावर भक्ती करणे भिन्न नाहीत, परलोकापेक्षा इहलोकच सुख-समृद्ध करणे महत्त्वाचे आहे आणि दैवी चमत्कारांपेक्षा माणसांनी एकमेकांशी गुण्यागोविंदाने नांदणे जास्त महत्त्वाचे आहे, दैनंदिन कामेच पूजाअर्चा करण्या-सारखी निष्ठेने करणे आवश्यक आहे ही बागूलांची धारणा या लेखात अति-शय उत्स्फूर्तपणे व्यक्त होते. आणि या धारणेत थोडासा अपुरेपणा असला तरी मूलतःच चूक असे काही नाही. हा निबंध वाचीत असताना मला टॉल्सटॉय च्या 'वॉर अ‍ॅण्ड पीस' मधील एका भागाची प्रकर्षाने आठवण झाली. तो भाग म्हणजे भग्न जीवीत नराशाची पिअरी अगदी हळूवारपणे समजून काढतो तो. पाने गळाली तरी झाड खिन्न होत नाही ते नव्या बहराने फुलते. रंग उडाला तरी आपण घर पाडीत नाही. आपण भिंती पुनः रंगवितो आणि घराला टवटवी आणतो. तसेच मानवी जीवनाचे आहे. दुःखे आणि विनाश यांच्यातून पुनरुज्जीवित होणाऱ्या मानवी जीवनातच ईश्वर सामावलेला आणि म्हणून आपण या बदलत्या आणि नित्य-नूतन होणाऱ्या मानवी जीवनावरच नितांत प्रेम केले पाहिजे. असे पिअरीचे (पर्यायाने टॉल्सटॉयचे) नटाशाला सांगणे आहे. आणि बागूलांनाही असेच काहीसे सांगायचे आहे. आस्तिक नास्तिकचा प्रपंच त्यासाठी आहे आणि हेतूमुळे तो प्रशंसनीय देखील आहे.

मग बागूलांनी वारकरी संप्रदाया-वरच सारे लक्ष्य का केंद्रित केले? त्याचे साधे पण खरे उत्तर हे आहे की त्या संप्रदायाच्या संस्कारातून मुक्त होण्याची त्यांची व्यक्तगत धडपड चालू आहे. त्यांचे धार्मिक वास्तव भागवत धर्माचे वास्तव आहे आणि नव्या व्यक्ती गत नात्यातून या वास्तवापासून आपण व्यक्त होऊ असा त्यांचा विश्वास आहे. न्याय अन्याय आणि खरे खोटेपणाच्या कसोटच्या अशा प्रयत्नांना आणि विश्वासाला लावणे फारच 'अ‍ॅकेडेमिक' होईल.

आस्तिक नास्तिक मधील चिंतन भावकाव्याच्या पातळीवरच उभे आहे.

□

**आस्तिक-नास्तिक**

देवीदास बागूल

विश्वमोहिनी प्रकाशन, पुणे

किंमत चार रुपये

एका चांगल्या योजनेचं मातेरं

# कामगार विमा योजना

सु. ल. सोमण

लोअर परेल स्टेशन नजिकच, ना. म. जोशी मार्गावर कामगार विमा योजनेच्या कार्यालयाची नवी वस्तू उभी ठाकली आहे. ह्या कार्यालयावर ६ जानेवारीला दुपारी ३॥–३॥। च्या सुमारास कामगारांचा मोर्चा गेला होता. सुमारे दहा हजारांचा, हातात लाल बावटे असलेला. कम्युनिस्टांच्या मुंबई गिरणी कामगार युनियनने आयोजित केलेला! मोर्च्याच्या काही प्रमुख घोषणा पुढीलप्रमाणे होत्या.

विमा कामगार योजनेचा कारभार सुधारा नाहीतर हप्ते कापणे बंद करा!

हप्ते चुकवणाऱ्या मालकांवर खटले भरा, नाहीतर खुर्च्या खाली करा!

कामचुकार अधिकाऱ्यांना झाडू मारा! वगैरे वगैरे.

विराट मोर्च्याचं रूपांतर सभेत झालं. कॉ. गुलाबराव गणाचार्य, कॉ. गंगाधर चिटणीस आदि वक्त्यांची भाषणं झाली आणि शेवटी ह्या व गंगाराम जाधव, रमाबाई कदम आदि नेत्यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं आपल्या मागण्यांचा, तक्रारीचा खलिता संबंधित अधिकाऱ्यांना सादर केला. डे. रिजनल डायरेक्टर, डॉ. सी. जोशींनी शिष्टमंडळांनी चर्चा करून कारभार सुधारण्याचं आश्वासन दिलं!

कामगार विमा योजना ही आजमितीला २० वर्षांची जुनी आहे. तिच्याविषयीच्या तक्रारीही नव्या नाहीत. ह्या योजनेविषयी असंतोषही कामगारात, विमा-योजनेच्या डॉक्टरांमध्ये खदखदत आहे. कामगारांमधला असंतोष सोयी पुरेशा उपलब्ध नाहीत म्हणून आहे. प्रत्येक कामगार कुटुंबावर औषधापायी सरासरीने किती खर्च व्हावा व प्रत्येक कामगारास आजारीपणाची रजा सरासरीने किती मिळावी याबाबतच्या शासकीय मर्यादाबाबत कामगारांत तीव्र राग आहे. खरे बघू जाता ह्या मर्यादा हास्यास्पद आहेत. ह्याखेरीज विमा योजनेखालील हॉस्पिटल्समधून विमायोजना-कामगारांसाठी राखून ठेवलेल्या खाटांचं अत्यल्प प्रमाण (सुमारे ८॥ लाख कामगारांसाठी मुंबईत फक्त १५०० खाटा राखून ठेवल्या आहेत), उपलब्ध असणारी निकृष्ट दर्जाची औषधं, हॉस्पिटल्समधली अंदाधुंदी वगैरे कारणांमुळे कामगार ह्या योजनेवर, त्यांच्या त्यासाठी कापल्या जाणाऱ्या मासिक हप्त्या

वर नाराज आहे. इतका की, ही योजना सक्तीची असण्याऐवजी ऐच्छिक असावी असाही आग्रह धरू लागला आहे.

ह्या योजनेतल्या अंदाधुंदीचं, गैर-कारभाराचं एक बोलकं उदाहरण कॉ. गणाचार्यांनी आपल्या भाषणात सांगितलं. मुरारजी मिलमधला ऑटो-खात्यातला एक कामगार रामैय्या हा एक तारखेला गिरणीच्या आवारात मरण पावला. आजारीपणात पॅनेल डॉक्टर व हॉस्पिटल ह्यांच्याकडे हेलपाटे घालत घालत थकला बिचारा आणि गिरणीच्या आवारात येऊन पडला. पॅनेल डॉक्टरांनी त्याला हॉस्पिटलमध्ये पाठवावं आणि हॉस्पिटल कर्मचाऱ्यांनी त्याला पुन्हा पॅनल डॉक्टरांकडे परत-वावं. ह्या फेकाफेकीत त्याला बिचाऱ्याला औषध मिळालंच नाही. आजार वाढतच गेला आणि वैतागानं दाद मागायला तो गिरणीत आला. तिथेच पडला.

हा प्रकार खरोखरच भयानक आहे. अशा तऱ्हेच्या टोलवाटोलवींची उदाहरणं तर अनेक आहेत. ह्या साऱ्यात काही तरी तथ्य निश्चितच आहे. म्हणूनच ह्या घटना गंभीर ठरतात. ह्यांची चौकशी होणं आवश्यक आहे. त्यावरची उपाययोजनाही तितकीच निकडीची आहे. ही उपाययोजनाही वरवरची, जुजबी नको तर काही तरी निश्चित स्वरूपाची हवी, ह्याखेरीज औषधांचा निकृष्ट दर्जा, महत्त्वाची औषधं दुकानातून उपलब्ध नसणं वगैरेही अनेक तक्रारी आहेतच.

ह्या प्रकरणाला डॉक्टर-वर्गाचीही एक दुसरी बाजू आहे. ज्या कारणांसाठी ह्या योजनेवर कामगार वर्ग नाराज आहे, जवळजवळ त्याच कारणांसाठी डॉक्टर वर्गही चिडलेला आहे. ते लिहून देतात ती औषधे उपलब्ध नसतात. जी चांगली ट्रीटमेंट रोग्याला द्यायला हवी ती, रोग्यामागे करावयाच्या खर्चाच्या सरकारी मर्यादेमुळे देता येत नाही. परिणामत: रोगी-कामगार पॅनेल डॉक्टरकडून मिळणाऱ्या औषधोपचाराबाबत फारसा आशावादी नसतो व शेवटी तो जादा पैसे देऊन खाजगी ट्रीटमेंट घेतो. ज्या कामगाराला हॉस्पिटलमध्ये ट्रीटमेंट द्यावी अशी शिफारस डॉक्टर करतात, त्यांना मर्यादित खाटांमुळे हॉस्पिटलमधून प्रवेश मिळत नाही. साहाजिकच, विमा योजनेचे डॉक्टर्सही ह्या सर्व गोंधळामुळे वैतागतात. त्यातूनच ह्या योजनेला, रजा मिळवण्याचं हुकमी साधन असं स्वरूप येतं. विमा योजनेचे डॉक्टर्स त्यामुळेच कामगार वर्गात 'रजाका डॉक्टर' म्हणून ओळखले जातात. ह्या साऱ्या गोंधळाची चीड डॉक्टर्सनी दोन वर्षांपूर्वी आपल्या संपातनं व्यक्त केली होती. दोन वर्षांनतरही ह्या प्रकरणी फारसा फरक नाही !

मूलत: ही एक चांगली योजना ! कामगारांना नाममात्र मूल्य द्यावं लागून चांगले औषधोपचार व्हावेत, ते तंदुरुस्त राहावेत व त्यातून उत्पादन वाढावं, राष्ट्रउभारणीला त्यांचा हातभार

**पृष्ठ ५७ वर**

— खास वार्तापत्र : सातारा

# मिनविरोधातून भाऊबंदकीकडे

प्रा. क्रांतिनाथ सातारकर

जिल्ह्यात काहीही महाभारत घडले तरी जिल्हापरिषदेत आम्ही पाच पांडव एक आहोत! असा निर्वाळा सातारा जिल्हा परिषदेचे शेती व सहकार सभापती भिकू नाना किवळकर यांनी औंध मुक्कामी जनता आघाडीचे अध्वर्यु राजे श्रीपतराव पंतांचे साक्षीने दिला. नानांच्या या उद्गाराचे प्रतिध्वनी विरतात न विरतात तोवर जिल्हापरिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचेवरील अविश्वास ठराव एक जानेवारी त्र्याहत्तर रोजी सादर करून वीर घोरपडे गटाने जिल्ह्याला नववर्षाची सनसनाटी भेट बहाल केली.

परिणामी सत्तास्पर्धेपायी दुष्काळाकडे दुर्लक्ष कराल तर जनतेपासून दूर फेकले जाल असा निर्वाणीचा इशारा नामदार यशवंतराव चव्हाण यांनी नुकताच दिला.

तथापि असे इशारे आता दोन्ही गटांच्या अंगवळणी पडले आहेत. या इशाऱ्यातील जुनी जरब १२ ऑगष्ट १९७२ रोजीच सातारा जिल्हा परिषदेच्या राजकारणापुरती तरी निदान संपली म्हणायला हरकत नाही. त्यादिवशी सातारा जिल्ह्यास सत्ताभूकंपाचा जो प्रचंड हादरा बसला त्याची नोंद थेट दिल्लीपर्यंत झाली. १९६७ सालच्या भूकंपापेक्षा हा हादरा शतपटीने भयंकर वाटला. त्या हादऱ्याने कोयना धरणास किरकोळ भेगा पडल्या होत्या तर या हादऱ्याने धोम धरणाचा (?) पाया अतोनात खचला. 'एकमुखी नेतृत्व' या गोंडस पातळ पापुद्र्याखाली खदखदणाऱ्या स्वतंत्र विचाराच्या लाव्हा रसाचाच हा प्रभाव! या धक्क्याने भलेभले वीर नामोहरम झाले. त्यांचा प्रताप लुटा पडला.

त्यादिवशी जिल्हा परिषद अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत काँग्रेस अंतर्गत दोन प्रतिस्पर्धी उमेदवारांना प्रत्येकी २९ मते पडली. चिठ्ठी उचलून लॉटरी

काढली ती भागवतराव देसाई या तथाकथित बंडखोर उमेदवारास लागली. सगळीकडे बोलले गेले की खऱ्याखुऱ्या लोकशाही स्वातंत्र्याची लॉटरी त्यादिवशी सातान्यात फुटली. उपाध्यक्षपदाचा निकाल त्याच बाजूने लागला. प्रा. बुवासाहेब जगताप हे ४ मते अधिक मिळवून निवडून आले.

—जिवंत लोकशाहीला आवश्यक असा विरोध साठ सालापर्यंत या जिल्ह्यात प्रकर्षाने तेवत होता. परंतु कोणत्यातरी गुप्त 'तत्त्वाने' उचल खाल्ली; अंधारात खलबते झाली आणि संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश मुंबईत आला; त्याचवेळी केवळ सत्तेच्या राजकारणाचा अमंगल घडा सातारा जिल्ह्यात भरायला सुरुवात झाली. तत्त्वांचे राजकारण साफ गाडले गेले. विरोधी मातब्बर सेनानी काँग्रेसमध्ये डेरेदाखल झाले. या 'यशवंत किमयेचा' अवघ्या महाराष्ट्रावरदेखील एवढा प्रभाव पडला की, पुढे कोल्हापूर, सोलापूर वगैरे बलाढ्य जिल्ह्यांना मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व नाही, याउलट या एकाच जिल्ह्यातील राज्य व केंद्र पातळीवर मिळून चार मंत्री झाले तरी त्याचे कुणाला वैषम्य वाटले नाही. एरव्ही जिल्ह्याला एक पालकमंत्री असतो तर येथे तालुक्यातालुक्यास पालकमंत्री मिळाला यातूनच 'करीन ती पूर्व व म्हणेन ती पश्चिम!' या पद्धतीने निर्णय होत गेले सहकारात आणि स्थानिक स्वराज्य संस्थातदेखील!

खरेदी विक्री संघ (खविस). भूविकास (भकास) बँक नॉर्थ सतारा डिस्ट्रिक्ट बँक (नासाडी) या महत्त्वाच्या सहकारी संस्थांच्या निवडणुका म्हणजे सारे 'अळीमिळी गूप चिळी! निवडणुकीची नोटीस कधी लागायची, कोठे लागायची, काय ठरायचे व कोणी ठरवायचे, याचा पत्ता जनसामान्यास कधीही लागत नाही. या निवडणुकीसाठी सहकारी सोसायटीचा प्रतिनिधी पाठविला जातो. त्याच्या नावाचा ठराव वर जातो परंतु असा ठराव करण्यासाठी पंचकमिटीची मिटिंग सहसा भरत नाही. पंचांच्या सह्या तेवढ्या प्रोसिडिंगवर नंतर घेतल्या जातात.

साध्या सोसायटी सेक्रेटरीच्या नेमणुकीबाबतही वेगळाच शिरस्ता. कोणत्या सोसायटीत कुणाचा 'इंटरेस्ट' आहे ते पाहून त्याचे सल्ल्याने सेक्रेटरीची नेमणूक चेअरमननिवडीत सभासदापेक्षा सेक्रेटरीचाच अधिक हात. त्यामुळे सेक्रेटरी करील ते चेअरमनला मान्य करणे भाग पडते. नंतर जनतेने 'चोरमन' म्हटले तरी याला मूग गिळून गप्प बसावे लागते. यातूनच मग एखादी बातमी येते की—

फलटण तालुक्यातील एकजण अन्नास मोताद होता तो सोसायटीचा सेक्रेटरी झाला व अवघ्या दहा वर्षात त्याने अडीच लाखांची प्रॉपर्टी जमविली. संपूर्ण चौकशी झालीच पाहिजे...

जिल्हा मध्यवर्ती व भूविकास बँकांच्या सावकारीचे तर शेतकरी हे हक्काचे कूळ झाले आहे. शंभराला

१० रु शेअर. ९ रु. व्याज, ३ रु. दंड-व्याज व ३ रु. सरचार्ज मिळून शेकडा सुमारे २५ दराने शेतकऱ्यास भूर्दंड पडतो. थकबाकीच्या उकळीकीसाठी या प्रभावळीच्या जवळचेच रिकव्हरी ऑफिसर नेमलेले असतात. 'बिनविरोध' राजकारणात नडणाऱ्या शेतकऱ्यावर धाड घालून, जप्ती आणून त्यांची बेअब्रू करण्यात हे 'पठाण' एकदम तरबेज ! (तोंड बघून नवे जुने केले जाते हे तर सर्वश्रुतच आहे). दरवर्षी या बँकांचे देखणे, भव्य अहवाल बाहेर येतात. त्यात 'साहेबा' बरोबर चेअरमनची छबी छापली जाते. चोख हिशोबी (?) उलाढालीचे कोटीमधले आकडे सभासदासमोर येतात. गगनचुंबी कार्यालये उठतात. या कार्यालयातील भव्य सभागृहात वार्षिक साधारण सभा भरते, -- 'सभासद या नात्याने तुम्ही या साऱ्यांचे मालक आहात--' असे शेतकऱ्यास ऐकविले जाते. तो थोडासा सुखावतो. परंतु वसुली नोटिशीचे दांडके येते तेव्हा त्याच्या पोटात गोळा उठतो.

यावर सहकारमंत्री श्वेतपत्रिका काढतात. 'फक्त ५ टक्के व्याजाचा दर' — हे कलम वाचून साऱ्यांच्या आशा पालवतात. समाजवादाची चाहूल लागते. खूप उहापोह होतो. असेंब्लीत चर्चासत्रे झडतात. परिसंवादांना ऊत येतो. वृत्तपत्रांचे रकाने भरतात. परंतु व्याजाचा दर तोच राहतो. कुणालाच उलगडा होत नाही. कागदावर मांडलेले गणित बिनचूक असते. उत्तर बरोबर येते. प्रत्यक्ष व्यवहारात मात्र उत्तर ५ टक्के येत नाही. आता कुठे उलगडा होऊ लागला आहे. गेल्या दोन महिन्यात एक बातमी झळकली आहे, सातारा जिल्हा भूविकास बँकेत लाखांची अफरातफर ! एका पैशाचाही महसुली खातेदार नसणाऱ्यास वीस हजार रुपये कर्ज दिले गेले. संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासक नेमला गेला ! सामान्य वाचक उद्गारतो, हाच का सहकारातील स्वाहाकार ? हाच का साहेबासमवेत फोटो असलेला आमचा नेता की, ज्याचे हात बळकट करण्याबद्दल साहेब म्हणाले होते ?

स्थानिक स्वराज्य संस्थात थेट खेड्यापर्यंत सत्तेच्या चौकटी, गोट निर्माण करण्यात आले. आपले नेतृत्व मानले जावे म्हणून 'सबठीक' असेल त्या गावातही विस्तव पुरण्यात हे लोक व त्यांचे हस्तक पटाईत असतात. 'गाढवाला गोपाळशेठ' म्हणतात आणि आणि स्वतंत्र बाण्याच्या तडफदार कार्यकर्त्यास बाजूला सारतात. कारण तो 'होयबा' होऊ शकत नाही. या नमुन्याचे बोलके उदाहरण परवा घडले. वाई तालुक्यातून एका साध्या जिल्हा परिषद सभासदास आटापिटा करून बिनविरोध निवडून आणले गेले. परंतु ज्यांची कर्तबगारी आहे त्या प्रा. बुवासाहेब जगताप यांना जाणून बुजून केवळ त्याना 'बिनविरोध येऊ द्यावयाचे नाही' या अट्टाहासापायी विरोधकास घोड्यावर बसवून कुणालाच काय प्रताप गाजविल्याचा आनंद वाटला कोण जाणे ?

## रचनात्मक कार्याचे आवाहन

एकोणीसशे सदुसष्टमध्ये सातारा लोकसभा मतदारसंघ साहेबांचेसाठी मोकळा करून देण्यात आला व त्या बदल्यात जिल्हा मध्यवर्ती बँकेत खांदे-पालट झाला. त्यानंतर एकदा गोवर्धन-दास पारेख यांचे मध्यवर्ती बँकेत भाषण झाले — 'विरोधकांना विध्वंसक कृत्यापासून परावृत्त करावयाचे असेल, अंतर्गत दुफळी पडू द्यायची नसेल तर सर्वांना रचनात्मक कार्यात सहभागी करून घेतले पाहिजे. इतरांना दूर ठेवून सारे श्रेय एकटयाने लाटण्याचे दिवस आता संपले आहेत...'

तथापी बँकेच्या वरच्या मजल्यावर बोलल्या गेलेल्या या दूरदर्शी विचाराचा प्रकाश पुढाऱ्यांच्या वरच्या मजल्यात मुळीच पडला नाही. सत्तेची धुंदी विचारशक्तीस बोथट बनविते. वैयक्तिक मोठेपणाच्या आसक्तीतूनच अन्याय-निर्मीती होते हेच खरे. या हव्यासातूनच 'कराड पाटण व्हर्सेस अदर्स' हा पहिला डाव साताऱ्याच्या राजकीय सारीपटावर टाकला गेला. तो थोडाफार सक्सेस-फुल झाल्यानंतर इतर तालुक्यात 'आपल्याला' मानणारे कार्यकर्ते वाढवायचे व इतरांना झोडपायचे तंत्र सुरू झाले.

—भविष्यातील या पाताळयंत्री बनावाची सुरुवात फलटण तालुक्यात तर सदुसष्टच्या सार्वत्रिक निवडणुकीचे वेळीच झाली. फलटण व खंडाळा या दोन तालुक्यांचा एकत्र विधानसभा मतदारसंघ आहे. सदुसष्ट साली फलटणमधील यशवंतरावजींच्या प्रचार सभेत खंडाळा पेठा ट्रकात घालून आणला गेला. सभेत प्रचंड दंगल व व दगडफेक झाली. 'राजेनिंबाळकरांनी खंडाळा पेठा झोडपून काढला—' असे चित्र निर्माण करण्यात आले. बदला म्हणून नाईक निंबाळकरांची प्रचारी जीप खंडाळा पेठ्यात जाळली गेली. अपेक्षित परिणाम घडला. खंडाळा पेठा राजांच्या विरुद्ध गेला. शिवाजी राजे पराभूत झाले. अध्यर्यावचनात राहणारे निवडून आले. यातूनच वैफल्य येत गेले, राजे दुर्बळ बनले व शेवटी नाइ-लाजाने युवराजमंडळी काँग्रेसवासी झाली. आणि मग आमदार विरुद्ध सभापती असा अंतीम कलगीतुऱ्याचा सामना १९७२ च्या जिल्हा परिषद व व तालुका पंचायत निवडणुकांत ठेवण्यात आला. हे दोघेही सामान्य शेतकरी कुटुंबातील. दोघेही विद्याविभूषित. दोघांनाही मालोजीराजांनीच मोठे केलेले. परंतु एकजण श्रेष्ठींच्या विश्वासातला तर दुसरा बुद्धीचा म्हणून गैरमर्जीतला. परंतु एव्हाना पाच वर्षात लोक शहाणे झालेले होते. स्वतंत्र विचाराच्या तुरेवाल्याचीच सरशी झाली व कलगीवाल्याची हालगी फुटली अजून फड उभा आहे म्हणून पाच वर्षे तमाशे करायचे एवढेच काम बाकी राहिले !

खटावच्या यशवंतराव चव्हाण कॉलेजचे संस्थापक व चालक माजी आमदार चंद्रहार पाटील यांच्या 'यशवंतनिष्ठे 'बद्दल कोण शंका घेईल?

पण वहात्तर साली केवळ यशवंतनिष्ठा पुरेशी नव्हती. आणखी एखादी व्यक्ति-निष्ठा (?) आवश्यक होती. खटावचे बंडखोर कुणी पोसले? त्यांना कुणी उठवून उभे केले? याचा पडताळा जिल्हा परिषद अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडणुकीतच आला. घोरपडे-वीर पॅनेलचे उपाध्यक्ष पदाचे उमेदवार होते वडूजचे दादासाहेब गोडसे! –बंडखोर आमदार केशवराव पाटील यांचे उजवे हात. तेच यावेळी निष्ठावंत काँग्रेसमन कसे ठरले देव जाणे! खटाव तालुक्यातील ही जुगलबंदी मैफल एव्हांना चांगलीच रंगली आहे.

एकोणीसशे सत्तावन्ननंतर गेल्या पंधरा वर्षात पराभव ज्यांनी अनुभवला नव्हता ती मंडळी जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष–उपाध्यक्षपदाच्या पराभवाने सैरभैर झाली. पक्ष, आदेश, निष्ठा, निरोप या साऱ्या शब्दांवर त्यांनी काट मारली. प्रदेश काँग्रेसच्या लेखी आदेशाने यशवंतबुवा माने, बाबूराव काळे, प्रा. भिंगारदेवे या तिघांनाही त्यांनी ३० ऑक्टोबर ७२ च्या रात्री जिल्ह्याच्या साक्षीने जिल्हा परिषदेच्या शिवाजी सभागृहात सपशेल लोळविले. बंडखोर जनता आघाडीचे एम. आर. भिलारे व भिकूनाना किवळकर यांनाच वीर–घोरपडे गटाने सभापती केले.

याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना लोक आजही बोलतात की, 'पर्यायी काँग्रेसचे अध्यक्ष अॅड. वसंतराव फाळके हे एक दिवटे आहेत व भागवतराव देसाई त्यावर तेल ओतताहेत–' असे निष्ठावान उद्गार काढणारे बाबूराव काळे यांना तरी निदान वीर–घोरपडे मंडळींनी विरोधी हात वर करून पाडायला नको होते. तर कोणी म्हणतात, भागवतराव देसाई- बुवासाहेब जगताप यांना स्वतः मत देऊन निवडल्यानंतरही त्या जल्लोशात काळ्यांनी अंगावर गुलाल टाकून घेण्यास अशुभ नकार दिल्यामुळे पुढे त्यांच्या अंगावर गुलाल पडण्याचा योग हुकला.

या सभापती निवडणुकीपूर्वी प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस निरीक्षक बी. जे. खताळ यांनी प्रदेश-काँग्रेसचा आदेश पाळला जावा यासाठी खूप आटापिटा केला. प्रदेश काँग्रेसच्या साताऱ्यातील नेत्यांची भेट घेतली– 'निदान तुम्ही तरी हे सावरा. त्यांना सांगा, आदेशाची बूज राखा!'

तर उत्तर मिळाले– 'आज दुपारीच वाई तालुक्याच्या पश्चिम भागातील वेलंग गटाच्या जिल्हा परिषद पोट-निवडणुकीचा निकाल लागला. बुवासाहेब जगतापांचा उमेदवार निवडून आला. आमचे नाक कापले गेले. आता कसला आदेश घेऊन बसलात? मी कुणाला सांगू शकत नाही!'

बाहेर जाणकार बोलत होते–' वेलंग गटाने वाई तालुक्याचा खरा कौल मत-पेटीतून व्यक्त केला!'

## साखळी नेतृत्व

अशा प्रकारे यशवंतरावजींच्या मतदारसंघात सातारा जिल्ह्यात बंडखोर सैन्याची जमवाजमव झाली. दोन बंड-

खोर आमदार निवडून आले. तालुका पंचायत निवडणुकांचेवेळी युद्ध पेटले. तेच पुढे जिल्हा परिषदेत भडकले आणि तालुक्यातालुक्यात पर्यायी काँग्रेस समित्या स्थापन होऊन त्याने महायुद्धाचे स्वरूप धारण केले. एकेकाळी भारताचे संरक्षणमंत्री म्हणून देशाचे संरक्षण करून उत्तुंग हिमालयासदेखील लाजविणाऱ्या या सह्याद्रीच्या कुशीतील 'यशवंत' सेनापतीस जिल्ह्याचे रक्षण करणे अशक्य झाले. तर कुणी म्हणतात की, 'रक्त सांडून केलेले राजकारण म्हणजे युद्ध आणि रक्त न सांडता लढलेले युद्ध म्हणजे राजकारण–' या व्याख्या तोंडपाठ असलेल्या या सेनापतीने घरातील या युद्धात हस्तक्षेप करण्याचे बुद्धिपुरस्सर टाळले व जिल्ह्याचे खरेखुरे रक्षण केले.

या रामायणास अतिमहत्त्वाकांक्षी नेतृत्व तर जबाबदार आहेच परंतु त्याहीपेक्षा समाजातील सत्तामनोऱ्यातील उतरंड, नेतृत्वाची साखळीपद्धतीच अधिक जबाबदार आहे. आजच्या या पंचायतराज्य प्रशासन व्यवस्थेत व सहकारी अर्थव्यवस्थेतच या सत्तास्पर्धेचे बिनविरोध निवडणुकांचे व पर्यायाने अन्यायाचे, दुफळीचे मूळ आहे. आज या व्यवस्थेत प्रत्येक गावास सत्तेची खिरापत या ना त्या स्वरूपात वाटली जाते. मध्यवर्ती बँकेचा डायरेक्टर, भूविकास बँकेचा डायरेक्टर, खरेदी विक्री संघाचा डायरेक्टर, तालुका पंचायतीचे तिकीट, जि. प. चे तिकीट, मार्केट कमिटी, सुपरवायझिंग युनियनचा सदस्य व त्यातूनही चुकला तर ऑनररी मॅजिस्ट्रेट व शेवटी काँग्रेस संघटनेत पदाधिकारी वगैरे एक ना दोन अनेक प्रकारची खिरापत वाटून गावंच्या गावं मिंधी केली जातात; कावीज केली जातात. 'लहानात लहान घटकाचा सत्तेत सहभाग' असे गुलजार फसवे नाव त्यास दिले जाते. परिणामी, अकलेचा दुष्काळ पडतो व नेत्याच्या चिठ्ठीप्रमाणे सोसायटीचा चेअरमन न झाल्यास त्या गावचे महत्त्व कमी होते; तेथील विकासकार्य थंडावतात. वरचे थरात डोकवायचे तर 'आज्ञाभंग' घडल्यास पदभ्रष्ट होऊन 'लोकनेता' म्हणून वावरावे लागते; अखेरची पायरी म्हणजे प्रकृतीच्या कारणास्तव राजसंन्यास घ्यावा लागतो. किंवा खूप सर्व्हिस दिली, आता वय झाले असे म्हणून 'गॅरेज' दाखविले जाते.

केंद्रीभूत होणे ही सत्तेची नैसर्गिक प्रकृती आहे हे सर्वांना माहीत आहे परंतु या प्रवृत्तीचा अतिरेक सातारा जिल्ह्यात कोणत्या थराला गेला आहे हे फारच थोड्यांना माहीत आहे. येथे आज तालुक्याचा आमदार गावच्या सोसायटीचा चेअरमन होण्याची इच्छा बाळगतो, नव्हे तर चेअरमन होतोच. तर महाराष्ट्र काँग्रेसचा मातब्बर नेता (ज्यांचा मंत्र्यावर देखील वचक आहे (होता) असे बोलले जाते) तो ग्रामपंचायतीचा सरपंच होतो!

गेले एक तप जिल्ह्याच्या राजकारणाची कोंडी झाली होती. सारे हतबल झाले होते. आता कोंडी फुटली

आहे. 'बिनविरोध' चा पोलादी पडदा आता बाजूला सरला आहे व त्या-मागची छुपी हुकूमशाही उघडी पडली आहे. नेत्यातून संघटना वजा केल्यास एक साधा नागरिक ही बाकी उरते. कुणा एकाला नेत्याने मोठे केले नसून ते काम संघटनेने केलेले असते हे नेत्याने विसरता कामा नये. संघटना नेत्यास प्रचंड शक्ती देते, त्या शक्तीचा वापर खऱ्याखुऱ्या गुणवंतास वाव देवून प्रसंगी येणाऱ्या दुष्काळासारख्या संकटास तोंड देण्यासाठी, विकासकार्यास वेग देण्या-साठीं केल्यानेच त्याचे नेतृत्व यापुढे टिकणार आहे. थुंकी झेलणारी नादान प्यादी हाताशी धरून चाली केल्यास राजकीय पटावर फासे उलटे पडल्या-शिवाय राहणार नाहीत. केवळ 'वरि-ष्ठांची मर्जी' एवढ्याच क्वालि-फिकेशनची मोजपट्टी सत्तेवर चढण्या-साठी लावली जात असल्यामुळेच कदा-चित भिकूनाना किवळकर नुकतेच म्हणाले की, 'होयबा कार्यकर्त्यांचं खोटं नाणं खपविण्यासाठी आमचं खरं नाणं नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्यास तो आम्हाला कदापी सहन होणार नाही!'

एकदा या गटाचा पराभव झाला तर दुसऱ्यांदा त्या गटाचा पराभव झाला. आता फिटंफाट झाली. आता दोघांनीही झाले गेले विसरून जावे. दुष्काळाकडे अधिक लक्ष पुरवावे; असे जनतेस वाटत असतानाच नुकताच अविश्वास ठराव सादर झाला आहे. 'पाच पांडव' एक आहेत का? ते पाच फेब्रुवारीस जिल्हा परिषदेच्या खास सभेत सिद्ध होईलच. दुर्दैवाने विपरीत घडल्यास इरसाल सातारा जिल्ह्यात 'यादवी' माज-ण्याचा गंभीर धोका आहे. या पार्श्वभूमीवर—

'आमच्या स्वाभिमानास मूठमाती देवून समन्वयाचे राजकारण करण्या-पेक्षा जनसामान्यांची अस्मिता जिवंत ठेवण्यासाठी आम्ही संघर्ष पत्करू!

—हे भागवतराव देसाई यांचे ताजे शब्द पुरेसे बोलके आहेत....

...चालू आहे एक स्वाभाविक प्रक्रिया – बिनविरोधातून भावबंदकी-कडे! ९।१।७३

◻ ◻ ◻

---

## कामगार विमा योजना

पृष्ठ ५० वरून

---

लागावा ही मूळची अपेक्षा. परंतु २० वर्षांच्या योजनेच्या राबतीनंतर दिसत ते चित्र विदारक आहे. कामगाराला व्हावा तो फायदा तर झालेला नाहीच, उलट त्याचे पैसे मात्र कापले जात आहेत हया सावळया गोंधळाला अधि-कारी, शासन, मालकवर्ग तीघांनीही हातभार लावला आहे.

आजही उशीर झालेला नाही. शास-नानं अजूनही खबीर पावलं उचलून योजनेतली घाण काढून टाकायचं ठरवलं. तर अशक्य काही नाही. मात्र त्यासाठी प्रयत्न हवेत. खंबीर प्रयत्न हवेत.

◻ ◻ ◻

## क्रीडांगण

# महाराष्ट्र संघ निवडीच्या निमित्ताने

डॉ. नरेंद्र दाभोलकर

प्रत्येक क्रीडाक्षेत्रात कर्तृत्वाचे आणि कौतुकाचे काही मानबिंदु ठरलेले असतात. महाराष्ट्र राज्याच्या प्रातिनिधीक संघात निवड होणे ही गोष्ट आज महाराष्ट्रातील कबड्डीपटू आपल्या यशाची आणि नशिबाची पावती मानतो. आणि म्हणूनच या भाग्यासाठी जबरदस्त चढाओढ लागते.

यंदाच्या वर्षी १९ ते २४ जानेवारीला जयपूर येथे होणाऱ्या अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाची सर्वसाधारण (वीस जणांची) निवड नाशिक येथील चाचणीस्पर्धेत झाली. या वीस जणातून बारा जणांची अंतिम निवड चार दिवसांच्या सराव चाचणीनंतर केली जाईल. आणि ते पुरुष व महिला संघ जयपूरला रवाना होतील.

निवडीमुळे सर्वांचे संपूर्ण समाधान व्हावे ही अपेक्षा अर्थातच चुकीची. व्यक्ती तितक्या प्रकृत्ती या नात्याने निवड समितीच्या सदस्यांचे प्रतिबिंब काही प्रमाणात निवडीमध्ये उमटणार आणि ते मान्य करावयास हवे. स्वतःला न आवडलेली निवड कशी चुकीची आहे हे सांगण्याचा वृथा अट्टाहासही आपल्या खेळाडूंच्या प्रेमापोटी केला जातो हेही खरे आहे. पण हे सर्व मान्य करूनही निवडीबद्दल काही लिहावेसे वाटते.

गुणवत्ता, खेळाडूचे वर्तन, त्याचा फॉर्म, अनुभव संघातील जागा यापैकी जे निकष ज्या पद्धतीने निवड करताना लावले जातात त्याचा एकदा नेमका खुलासा महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशने करावयास हवा. प्रत्येक जिल्ह्याला प्रतिनिधीत्व देण्याच्या कल्पनेत गुणवत्ता कितपत डावलली जाणार याचाही एकदा निश्चित विचार व्हावयास हवा. तरुण रक्ताला कोणत्या प्रकारे आणि किती वाव द्यावयाचा याचेही गणीत नेमके करावयास हवे. या निकषावर आधारीत यावेळच्या निवडीकडे पाहिल्यास काय दिसते.

वीसजणांची निवड आधी करावयाची आणि मग जयपूरला निघताना आठ पुरुष आणि आठ महिला खेळाडूंना घरी पाठवावयाचे हे खरे तर एकापेक्षा अनेक दृष्टीने चुकीचे आणि अन्यायकारक वाटते. नेहमीच्या चाचणी स्पर्धेपेक्षा मनमाडची आणखी एक स्पर्धा यावेळी खेळाडूंचा खेळ बघण्यास उपलब्ध होती. मनात आणले असते तर निवड समितीला पुण्याच्या राणा-

प्रतापच्या सामन्यांना बोलावून महाराष्ट्रातले बहुसंख्य उत्तम खेळाडूंनी भाग घेतलेल्या त्या स्पर्धेत खेळाडूंच्या कौशल्याचे आणखी एक अवलोकन करता आले असते. उमेदीने सरावासाठी येणाऱ्या त्या खेळाडूंना १२ जणांच्यात निवड न झाल्याने परत जाताना ज्या वेदना होतील त्या खरा खेळाडूच उमगू शकेल.

यामुळे खेळाडूंच्या कसाची काही विशेष परीक्षा होऊन महाराष्ट्राचा संघ अधिक बळकट होण्यास मदत होईल. हेही फारसे खरे नव्हे. वीसजणांच्यापैकी कोणता संघ निवडला जाईल याबाबत शेवटी दिलेला अंदाज अपवाद वगळता खोटा ठरणार नाही आणि त्यातही अंतिम सामन्यात कोण खेळतील यांच्या भविष्याबद्दलही आताच निदान वर्तविणे अवघड नाही. नाहीतरी दरवर्षी महाराष्ट्र राज्य चौदा खेळाडूंची नावे जाहीर करतेच. मग फक्त सहा अधिक खेळाडूंना संधी देण्यासाठी सर्व खेळाडूंच्या डोक्यावर टांगती तलवार ठेवण्याची खरोखरच आवश्यकता होती काय? याचे एक कारण सरळ दिसते. आतापर्यंतच्या प्रत्येक निवडीच्या वेळेस जिल्ह्याला प्रतिनिधित्व नाही या कारणासाठी अनेक जिल्हे नाराज होत. या वीस जणांच्या यादीमुळे त्यापैकी काहींना तात्पुरते प्रतिनिधित्व देऊन त्यांचा राग तात्पुरता थांबवता आला. अर्थात ही भूमीका तकलुपी आहे हे कोणीही सांगू शकेल. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोशिएशन one state one Federation चा उच्चारवाने पुकार करते. आज ना उद्या ते होईलही. मग महाराष्ट्राच्या सव्वीस जिल्ह्यांना प्रतिनिधित्व देणे तुम्हाला शक्य होणार का? गुणवत्तेला प्रतिनिधित्व ही भूमिका जर मान्य झाली तर मग विनाकारण जिल्ह्याला खूष करण्याच्या मागे जाण्याची गरज नाही.

वीस जणांच्या या यादीत आणखीही एक धोका संभवतो. आपल्या मित्रांचा खेळ व्हावा आणि दुसऱ्यांचा पडावा या सर्व पद्धतशीर प्रयत्न खेळाडू करतात हा अनेक निवडीबाबतचा माझा अनुभव आहे. वीस जणांच्या सरावात याबाबत अनायासे संधि उपलब्ध करून दिली जाणार आहे. खेळाडूंना हे इतक्या सफाईने करता येणे शक्य असते की एका गटाने ठरवले तर एका विविक्षित खेळाडूचा खेळ चांगला करणे वा पाडणे त्यांना सहज शक्य व्हावे. हा धोका कसा नाकारणार?

यानंतर प्रत्यक्ष निवडीचा विचार करू. संघाची निवड ही त्यांच्या संघातील जागांच्याप्रमाणे (placing) होणार असे जाहीर केले होते. निवड करताना निवड समितीने हीच दृष्टी समोर ठेवली आहे हेही आवर्जून सांगण्यात आले. मग वीस जणांची नावे जाहीर करताना ती याच प्रकारे जाहीर केली असती (उदा–कोपरा. मध्यस्थक- वगैरे) तर सर्वांनाच खूप सोईचे झाले असते. नाहीतर आता निवडीचे स्वरूप काय दिसते. डाव्या कोपऱ्यासाठी मुंबईचा अनंत भांभिरे, सातारचा

विजय जाधव पुण्याचा मालिक भोगाडे आणि उस्मानाबादचा खळदकर ही नावे डोळ्यासमोर येतात. या चारीही जणांनी आपापल्या संघात डावा कोपरा सांभाळला होता. उजव्या कोपऱ्याला मात्र मग एकमेव वसंतसूदच निवडलेला दिसतो. दुसरे नाव घेता येईल ज्याला सर्वच मध्याच्या सामन्यात मुंबईकरांनी अर्धा डाव खेळवला त्या परशुराम कंबळीचे संपूर्ण सामन्यात उजवा कोपरा म्हणून शिवाजी जगतापचा झालेला खेळ कोणीही नाकारू शकणार नाही. असे असताना त्यांनी सबंध सामन्यात एखा-दाही कोपरा धरला नाही त्या परशुराम कंबळीचा विचार कोपऱ्यासाठी कसा केला गेला? बर त्याचा केला गेला नाही म्हणावे तर मग प्रत्येक जागेसाठी दोन-दोन किमान खेळाडू निवडण्याचे धोरण असताना शिवाजी जगतापला का गाळला? खेळाच्या कसोटीवर तो कोपरा म्हणूनसुद्धा दुय्यम ठरल्याचे कोणीही दाखवून द्यावे.

डाव्या मध्यरक्षकाबद्दल नेमके हेच झाले आहे. सबंध सामन्यात लक्ष्मण बिरवडकरने एकही महत्त्वाची पक्कड केली नाही फॉर्मात असताना डावलला आणि फॉर्म संपल्यावर निवडला अशी चर्चा त्याची जिल्ह्यातून निवड झाल्या-बद्दलच चालू होती. या उलट सोलापूर व मुंबईच्या दोन्हीही सामन्यात फादा-कुरेशीच पकडीचा खेळ अप्रतिम झाला होता. तो कोणत्या निकषावर गाळला गेला? उजव्या मध्यस्थकाच्या जागी चंद्रकांत भारती रीठे वा सांगलीचा घोडके यांच्यापैकी एकजण खेळेल. राठेने या संपूर्ण सामन्यात मध्यस्थकाची कामगिरी कधी बजावलीच नाही. घोडके वा मुंबईच्या भारतानेही फारशी चमक दाखविली नाही. (अर्थात भारतीला निदान मनमाडच्या खेळाचा आधार आहे) या उलट उस्मानाबादच्या लोकरेने सातत्याने या सामन्यात उत्कृष्ट पकडी केल्याशिवाय चढाईचाही खेळ केला. त्याला गाळताना कोणत्या कसोट्या लावण्यात आल्या. याबाबतची निवडसमितीची भूमिका कळण्यास या व इतर खेळाडूंना ती निश्चित मदतीची ठरेल.

यासाठी एक गोष्ट मला सुचवा-वीशी वाटते. कबड्डीचे गुणपत्रक हे आता अधिक व्यापक (क्रिकेटसारखे) करा-वयास हवे. किमानपक्षी पुढील वर्षा-पासून ज्या चार सामन्यातून महाराष्ट्र राज्य संघाची निवड होणार त्याबाबत तरी हे शक्य व्हावे. या गुणपत्रकावर कोणी किती चढाया टाकल्या, किती गडी मारले किती धरले त्यावेळी संघात किती गडी होते याबाबतची नोंद व्हावी. शक्यतो गडी कोणत्या प्रकारे धरले वा मारले याचीही नोंद करावी. (उदा. गडी हाताने, लाथेने वा पायाने मारले वा ब्लॉकने, एकेरी पटात, साखळी टाकून धरले वगैरे) ही गोष्ट फारशी अवघड मुळीच नाही लोक जादा गुण-लेखक प्रत्येक सामन्यात १ बसविल्यास काम भागेल. यावरून संपूर्ण सामन्यात सहजपणे कोणी किती गडी मारले किती चढाया टाकल्या किती पकडी

घेतल्या याला शास्त्रीय आधार लाभेल आणि निवडसमितीचे कामही सोपे होईल. म. रा म. अ. हे मनावर घईल काय? (त्यांची इच्छा असल्यास हे पत्रक कसे असावे हे ही करून देण्यास तयार आहे).

महिलांच्या संघ निवडीबाबत फारसे लिहिण्याची गरज नाही. कारण मुळात पुण्या-मुंबईबाहेर महिला कबड्डी पोचलेलीच नाही. शिवाय फालतू संघावरोबर गुणांचे डोंगर रचणे आणि चांगल्या संघाविरुद्ध सपशेल हरणे हे प्रकार बऱ्याच चांगल्या संघाबाबत यंदा घडले. त्या (उदा. एस्. एन. डी. टी. चा संघ जो आधीच्या सामन्यात प्रचंड गुणसंख्या करत होता तो साधना संघाविरुद्ध एकही गुण नोंदवू शकला नाही.) आता त्यापैकी कोणता खेळ विचारात घ्यावयाचा हे सामना समितीच्या मनावर, दुसरे असे की महाराष्ट्रीय महिलांचा संघ कसाही असला तरी तो अजून अखिल भारतीय पातळीवर अपरीचितच आहे आणि अजून बरेच दिवस राहील अशी चिन्हे आहेत. याचमुळे अधिकाधिक नव्या चेहऱ्यांना थोडा धोका पत्करूनही पण संधी देण्याची तयारी दाखवली जावी असे सुचवावेसे वाटते.

संघनायकत्व, उपसंघनायकत्व याबाबतची म. रा. क. अ. नी एक निश्चित भूमिका घेणे आता अत्यावश्यक आहे. सध्याची त्याची भूमिकाही अनाकलनीय आहे. खरे तर उपसंघनायकाने नंतर संघनायक व्हावे आणि एकदा संघनायक झाल्यावर निवृत्त व्हावे अन्यथा खेळ खरोखरच फॉर्मात असेल तर त्याला पुन्हा संघनायक करावे असा एक संकेत निर्माण व्हावयास हवा होता.

महिलांच्या बाबतीत तर संघनायक व्हावे आणि राष्ट्रीय स्पर्धेतून निवृत्त व्हावे असा अलिखित नियम झाला असता तर महाराष्ट्राचे काही नुकसान न होताही अनेक नवोदित खेळाडूंचे दुवे संघटकांना मिळाले असते. सर्वोच्च मानाचे पद भोगल्यानंतर पुन्हा खेळाडू म्हणून आणखी काही वर्षे संघात रहाण्याची इच्छा दाखविण्यापेक्षा सन्मानाने तेवढ्या स्पर्धेपुरती निवृत्ती जाहीर करणे यात खेळाडूंचाही मोठेपणा होता. अजूनही याचा विचार करता येईल.

संघनायक निवडताना त्याच्या खेळाच्या दर्जाबरोबरच संघनायक म्हणून त्याचे काही खास गुण आहेत का याचा महत्वाचा विचार करावा लागतो. असे गुण आढळतात म्हणून त्याला संघनायक केले जाते. ज्याच्यामध्ये हे गुण थोडे कमी आहेत परंतु संघनायक संघात नसताना जो संघाची धुरा सांभाळू शकेल त्याला उपसंघनायक केले जाते. खेळाच्या कौशल्याव्यतिरिक्त संघनायक म्हणून काही खास गुणवत्ता असावी लागते हे मान्य होण्यात अडचण नसावी. याचा अर्थ असा होतो की एकदा उपसंघनायक झालेला खेळाडू जर त्याचा खेळ संघात प्रवेश मिळवण्याएवढा कायम असेल तर पुन्हा उपसंघनायक तरी झाला पाहिजे वा संघनायक तरी. प्रत्यक्षातले अनुभव अत्यंत विचित्र




PRATIBHA-1511-10-MAR

आहेत. एकदा उपसंघनायक असलेला गुराप्पा पारशेट्टी संघात असताना बाळ कोंढाळकर उपसंघनायक होतो. नंतर त्याच्याबरोबर संघात असलेल्या फीदा कुरेशीला उपसंघनायकत्व बहाल करून बाळासाहेबांची बारावा नंबरवर हकालपट्टी होते. आणि नंतर फॉर्म शिल्लक असताना खेळ होऊनही उप-संघनायकत्व आणि संघातला प्रवेश याबाबत फीदा कुरेशीला डच्चू दिला जातो. याची काही तार्किक सुसंगत कारणमीमांसा म. रा. क. अ. करेल काय ? का उपसंघनायकत्व हे त्या त्या वेळच्या निवडसमितीच्या इच्छेनुसार खिरापत म्हणून वाटले जाते ? बहुसंख्य वेळेला निवडसमितीचे २–३ सदस्य हे मुंबई जिल्ह्याचे असतात. मुंबई-करांच्यात खेळ आहे हे मान्य करूनही या कारणामुळे मुंबईकरांना झुकते माप मिळते. असा एक समज महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यात पसरला आहे. ही भावना खोडून काढण्यासाठी सतत दोन-तीन वर्षे निवड समितीचे सर्व सदस्य हे मुंबईबाहेरील, आणि तेही प्रत्येक वेळेस वेगळ्या जिल्ह्याचे, तसेच एका जिल्ह्याची एका वेळी एकापेक्षा अधिक व्यक्ती न निवडता अशा योजनेने ठरविले गेले पाहिजेत. यामुळे वरील गैरसमजुतीत काही तथ्य आहे की नाही हे ठरविण्यास मदत होईल.

शेवटी एक. महाराष्ट्रातील कबड्डीचा प्रसार व लोकप्रियता वाढती आहे अशा वेळेला विधायक टीकेचा निश्चित फायदा कबड्डीला मिळू शकेल. याबाबतची महाराष्ट्र कबड्डीचे अध्वर्यू शंकरराव साळवी यांची भूमिकाही या टीकेचे स्वागत करण्याचीच आहे असे वाटते. परंतु दुर्दैवाने महाराष्ट्रातले अनेक मातबर संघ त्यांचे चाहक व खेळाडू ही भूमिका नाकारतात आदले-वर्षी (७१ साली) साताऱ्च्या अ. भा. महिला कबड्डी स्पर्धेत अजिक्य ठरलेला मुंबईच्या नवयुग क्रीडाने दुसऱ्या वर्षी (७२ साली) साताऱ्च्या स्पर्धेला येण्याचे नाकारले. सातारसारख्या शह-रात जेथे महिला कबड्डी नुकतीच लोक-

---

## अंदाज

महाराष्ट्र राज्याचा वीस खेळाडू-तून निवड होणारा संघ १. वसंत सूर २. काशिनाथ रीठे ३. शेखर शेट्टी ४. अनंत नाभिर ५. परशु-राम कंबळी ६. लक्ष्मण बिरवडकर ७. चंद्रकांत भारती ८. प्रकाश बोरकर ९. विजय जाधव १०. मधु रोळे

१. दत्ता पाथ्रीकर २. संपत गोळे ३. खळदकर ४. धनंजय महाबळे-श्वरकर.

यापैकी दोघेजण

अंतिम सामना खेळणारा संघ

पहिले आठपैकी सात.

□

प्रिय होऊ लागली आहे त्या स्पर्धेत नाही म्हटले तरी यामुळे थोडे अपुरेपण आले. नवयुग क्रीडा मंडळाने याची केलेली कारणमीमांसा बालीश वाटली. नवयुग क्रीडा मंडळाची एक खेळाडू अरुणा चव्हाण ही मागच्या वर्षीच्या राज्य चाचणी स्पर्धेत एस. एन. डी. टी. कडून खेळत होती. तिचा संघ उपांत्य-पूर्ण फेरीत पराभूत होऊनही तिला सर्वोत्कृष्ट खेळाडूचे सुवर्णपदक कोणत्या गुणावर दिले असा प्रश्न मी माझ्या एका लेखात केला होता. अरुणा चव्हाणच्या सामन्यातील खेळाच्या आधारे माझे म्हणणे कोणी सप्रमाण खोडले असते तर मी ते मानले असते. पण तो प्रयत्न कोणीच केला नाही तर मी साताराच्या श्री शिवाजी उदय मंडळाचा एक सदस्य म्हणून आमच्या स्पर्धेवरच नवयुग क्रीडाने बहिष्कार टाकला. संस्थेतील एका सदस्याने पत्रकार नात्याने काही टीका केल्यास त्याचा प्रतिकार करण्याचा हा मार्ग कोणत्या खिळाडूपणात बसतो? पत्रकाराच्या स्वातंत्र्याचा संकोच करण्याची ही वृत्ती आणि टीकेला उत्तर देण्याची ही मुलखावेगळी रीत याने खेळाचे आणि कबड्डीचे कोणते भले साधले गेले? आज महाराष्ट्रातील कबड्डी बद्दल अनेक विधायक सूचना व टीका करण्यासारखी असूनही केवळ भीती-पोटी त्याबद्दल बोलण्याचे कबड्डीतील क्रीडापटू टाळतात. त्या खेळाडूंना अभय देणे त्यांच्या रास्त टीकेची दखल घेणे आणि टीका अवास्तव वाटेल तर त्याचा एक विचार म्हणून (व्यक्ती म्हणून नव्हे) खरपूस समाचार घेणे या गोष्टी म. रा. क. अ. ने चालू केल्यास महाराष्ट्रातील कबड्डी अधिक जोमाने बहरण्यास मदत होईल असे वाटते.

□ □ □

## माणूस

यापुढील अंक (२७।१।१९७३)

२६ जानेवारी विशेषांक

किंमत : एक रुपया

आकार नेहमीचा : पृष्ठे सुमारे शंभर

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**